# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २९ सप्टेंबर २०२३




# निरोप घेतो देवा आता आज्ञा असावी

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : राज्यभरात लाडक्या गणरायाला प्रचंड उत्साहात भावपूर्ण निरोप देण्यात आला. बहुतांश भागात दुपारनंतर पावसाला सुरूवात झाल्यामुळे उत्साहाला उधाण आले होते. मुंबईत शुक्रवारी पहाटेपर्यंत विसर्जन मिरवणुका सुरू होत्या.

गिरगावात विसर्जनाच्या दिवशी मोठी गर्दी होती. सकाळपासूनच नागरिकांनी येथे विसर्जन मिरवणुकीसाठी गर्दी केली होती. गिरगाव चौपाटी भागातही मोठ्या प्रमाणात गर्दी होती.

पुण्यात पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणपती विसर्जनाच्या मिरवणुका निघाल्या. मानाच्या गणपतींच्या विसर्जन पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांनी गर्दी केली होती.


छत्रपती संभाजीनगर शहरात सुमारे 12 ते 15 मोठ्या विसर्जन मिरवणुका निघाल्या. मुख्य मिरवणुकीशिवाय सिडको-हडको, चिकलठाणा, मुकुंदवाडी, नवीन शहर, वाळूज, हर्सूल, सातारा, छावणी, जिन्सी येथूनही मिरवणुका निघाल्या. यंदा प्रथमच पाच अत्याधुनिक ड्रोन कॅमेऱ्यांनी गस्त करण्यात आल्याची माहिती पोलिस आयुक्त मनोज लोहिया यांनी दिली.

न्यायालयाच्या आदेशानुसार मिरवणुकीत डीजेच्या आवाजाची पातळी मोजण्यासाठी विशेष पथक तैनात केले होते. रात्री 12 वाजेपर्यंत वाद्यांना परवानगी असली तरी मिरवणुकीतील डीजेच्या आवाजाची पातळी मोजली जात होती. तसेच मशिदींजवळ विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मनपाच्या अग्निशमन दलाने 8 ठिकाणी नियंत्रण कक्ष उभे केले होते.

नाशिकला गणपती विसर्जनासाठी महापालिकेसह पोलिस प्रशासन सज्ज होते. 21 चित्ररथसहभागी असलेली बाप्पाची मिरवणूक वाकडी बारव येथून सकाळी 11 वाजताच सुरू झाली. मिरवणूक मार्गावर 70 सीसीटीव्हींसह 4 ड्रोनची करडी नजर होती. पर्यावरणपूरकतेचा विचार करुन पालिकेने 56 कृत्रिम तलावांची निर्मिती केली होती. तर 27 नैसर्गिक तलावही सज्ज ठेवले होते. यासह काही स्वयंसेवी संस्थांनीही विसर्जन कुंड तयार केले होते. शहर पोलिस दलात पोलिस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली 4 उपायुक्त, 7 सहाय्यकआयुक्त, 59 निरीक्षक, 67 सहाय्यकनिरीक्षक, 127 उपनिरीक्षकांसह 3,000 अंमलदार व एक हजार होमगार्ड तैनात होते. यासह दंगल नियंत्रण पथक, राज्यराखीव दल, जलद प्रतिसाद पथक, गुन्हे शोध पथक तैनात करण्यात आले होते.

## जलधारांनीही दिला बाप्पाला निरोप

गेल्या महिन्याभरापासून दडी मारून बसलेल्या पावसाने गणपतीच्या आगमनापासून पुन्हा बरसायला सुरुवात केली होती. गणेशोत्सवाच्या सुरुवातीच्या पाच दिवसांत मुंबईसह राज्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस झाला. आता विसर्जनालाही गणरायावर मेघवर्षाव झाला. दरम्यान, पुढचे ४८ तास महाराष्ट्रात यलो यलर्ट जारी करण्यात आला. कोकणात अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान तज्ज्ञ के. एस. होसाळीकर यांनी यासंदर्भात ट्वीट केले आहे. गुरुवारी सकाळपासून मुंबईसह राज्यातील सार्वजनिक गणपती मंडळांचे बाप्पा विसर्जनासाठी मंडपाबाहेर पडले. तसेच गणरायाच्या निरोपासाठी जलधारीही धाऊन आल्या. भरपावसात ढोल–ताशा–लेझिमच्या तालात बाप्पाला निरोप दिला. मुंबई, पालघर, ठाणे, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, जालना, सोलापूर, उस्मानाबाद, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, परभणी, नागपूर, भंडारदरा, गोंदिया, अमरावती, आदी जिल्ह्यांमध्ये २८ सप्टेंबरसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. म्हणजेच, येथे पावसाच्या मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर सिंधुदुर्गात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आल्याने तिथे अति मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, नंदूरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा, अकोला, वाशिम येथे ग्रीन अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, अमरावती, नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारदरा, गोंदिया आदी ठिकाणी यलो अलर्ट दिल्याने येथे मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट दिला असून येथे मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बाकी उर्वरित महाराष्ट्रात तुरळक सरी कोसळतील.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी


या पुस्तकातील पहिला लेख 'जरा थांबा, विचार करा' याच शीर्षकाचा आहे. हा लेख वाचताना, 'अरेच्चा, असं आहे तर ! आपण कधी असा विचारच केला नाही' असे वाचकाला वाटते. दुसरा लेख 'सुगंध दरवळू द्या' या नावाचा आहे. नावाप्रमाणेच या लेखातील शब्दाशब्दातून मन प्रसन्न करणारा शब्दसुगंध दरवळतो आहे. जीवनातील एखादी छोटीशी गोष्ट किती महत्वाची असते ते यात सहजपणे पटवून दिले आहे. लेखिकेच्या माहेरी मोठे कुटुंब होते.

लेखिकेची आई माठातील पाण्यात टाकण्यासाठी जेव्हा वाळा उपलब्ध नसायचा तेव्हा, रोज माठात एक छोटेसे मोगऱ्याचे फुल टाकायची. ते छोटेसे फुल माठातील सगळे पाणी सुगंधित करायचे. आपल्या साड्या खराब होऊ नयेत म्हणून त्यांची आई ज्या पेटीत त्या साड्या ठेवायची, त्या पेटीत फक्त एक केवड्याचे पान ठेवायची. ते एक छोटेसेच पान पण किती सुदंर किमया करायचे ! साड्याना कसर तर लागायची नाहीच पण त्या साड्याना एक सुदंर सुगंध प्राप्त व्हायचा. अशाच प्रकारची किमया काही व्यक्ती आपल्या जीवनात करून जातात. एखादी वाऱ्याची झुळूक मन प्रसन्न करून जावी तसे या व्यक्तींचे आपल्या जीवनात येणे, त्यांचे आपल्याभोवती वावरणे, त्यांचे बोलणे मन प्रसन्न करून जाते. 'अंदाज अपना अपना' या लेखात लेखिका म्हणते की

# जरा थांबा

समोरच्या व्यक्तीच्या वागण्याबोलण्यावरून आपण त्याच्या वागण्याचा अंदाज बांधतो. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत तो अमुक एका पद्धतीनेच वागेल किंवा त्याने वागायला हवे असे जणू आपण ठरवूनच टाकतो. पण एखाद्या विशिष्ट परिस्थितीत जेव्हा ती व्यक्ती आपल्याला अपेक्षित असे वागत नाही, तेव्हा मात्र आपल्याला धक्का बसतो. पण मुळातच अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. एखादी व्यक्ती विशिष्ट परिस्थितीत अमुक एक प्रकारेच वागेल किंवा प्रतिसाद देईल असे सांगता येत नाही कारण प्रत्येक व्यक्तीचा 'अंदाज अपना अपना'. त्यातील मर्म लेखिका उलगडून सांगते. भोवतालच्या निसर्गाबद्दल, गोष्टींबद्दल आपण सारख्या तक्रारी करत असतो. त्याऐवजी त्याकडे पाहण्याची दृष्टी बदलली तर... ? सारेच बदलून जाईल. जगात सगळेच वाईट असते असे नाही. खूप चांगल्या गोष्टी पण आपल्या अवतीभवती असतात. जोपर्यंत आपण त्यांच्याकडे त्या दृष्टीने पाहत नाही, तोपर्यंत आपल्याला त्यांच्यातील सौंदर्य, चांगुलपणा, गोडवा यासारख्या गोष्टी लक्षात येणार नाहीत. सुंदरता टिपण्याची सुद्धा दृष्टी विकसित करावी लागते.. 'सृष्टी नव्हे, तर दृष्टी बदला' असा सुरेख संदेश हा लेख आपल्याला देतो.



# आनंदी पहाट

## विवाह संस्कारक्षम संसाराची सुरुवात सुखद

आधुनिक केसरी

विवाह करण्यामागचे खरे कारण न समजण्याची उणिव असेल तर असे विवाह दीर्घकाळ टिकत नाहीत अथवा टिकले तरीही व्यक्तिगतरीत्या ते असफल झाल्याचेच स्पष्ट होते. विवाहबंधन असा शब्दप्रयोग आपण सर्रास ऐकतो-करतो, तोच खरे तर चुकीचा असल्याची जाणीव करून घेणे आवश्यक असते. सर्व बंधने झुकारून वैवाहिक सुख, समाधान आणि शांती शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, वैवाहिक, शैक्षणिक पातळींवर परस्परांना देण्यासाठी कटिबद्ध असणे जरुरीचे असते. ह्याठिकाणी स्वतः पेक्षा सहचारीणीचा विचार प्रकर्षाने, प्राधान्याने आणि प्रामुख्याने करणे अभिप्रेत असते. ह्या दृष्टीकोनातून स्वार्थ नाही तर परमार्थ महत्वाचा ठरत असतो. स्त्री-पुरुष दोन्हीही जीवशास्त्रीय दृष्ट्या दोन स्वतंत्र व्यक्तीमत्व आहेत. त्या दोघांमध्ये निसर्गतःच विलक्षण आकर्षण असल्याचे वैज्ञानिक प्रयोगातून स्पष्ट झाले आहे. स्त्री पुरुषांच्या नैसर्गिक आकर्षणातून केल्या जाणाऱ्या विवाहाला समाजस्थैर्याचा आधारभूत अशा विवाह संस्थेचे उदात्त रूप देण्याचे महत्वपूर्ण कार्य विवाह संस्कार करत असतात. विवाह हा स्थिर म्हणजे दीर्घकाळ टिकणारा तसेच सुख, समाधान आणि मनःशांती देणारा कसा ठरेल, त्यायोगे घराण्याला स्थैर्य लाभून मागील-पुढील पिढ्यांना आणि पर्यायाने समाजाला स्थैर्य कसे लाभेल, यासाठी अनेक नियम आणि कायदे प्रस्थापित केल्याचे आपल्या सर्वांना ज्ञात आहेच. विवाह हा स्थिर आणि सुप्रजाकारक कसा होईल, ही काळजी वैदिक काळापासून आधुनिक काळापर्यंत प्रत्येकाला सदैव लागलेली असल्याचे आपण सर्वत्र अनुभवतो. अर्थात, ह्याच काळजीतून विवाह संस्थांची उभारणी होत असल्याचे आपण सर्वचजण जाणतो. पती-पत्नी यांचे वैवाहिक संबंधांमुळे निर्माण होणारे सामाजिक स्थान त्याच दृष्टीने महत्वाचे ठरते. पती-पत्नींचा परस्परांवर अपेक्षित असणारा विश्वास त्यांच्या नातेसंबंधासाठी महत्वाची भूमिका बजावीत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### दास तुझा व्हावा | जन्मोजन्मी ||

भोग भोगोनिया | मुक्त व्हावे जीवा ||
फिरोनी ह्या जन्मा | नको येणे ||१||
दुःखाच्या डोंगरी | संयमाचे घर ||
ज्ञानाचे माहेर | असे तेथे ||२||
आप-पर भाव | ठेवू नये मनी ||
संसाराचा धनी | स्थितप्रज्ञ ||३||
दैवाच्या गतीला | टाळी कैसा सांग ||
सटवाईचा पांग | फेडू येथे ||४||
माझ्या अंतरीचा | धावा ऐक देवा ||
दास तुझा व्हावा | जन्मोजन्मी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

देहि दृढतरां श्रद्धां मह्यं कमललोचने|
अपर्णे शिवात्मिके त्वां दुर्गां देवीं नमाम्यहम्
||९८|| हे कमललोचने, मला दृढतर अशी श्रद्धा दे. हे अपर्णे, हे शिवात्मिके, तुला दुर्गा देवीला मी नमस्कार करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अमर लोक से आवहीं, सद्गुरु सन्त प्रधान। ऋषि मुनि सुर नर वोधहीं, श्रुति कविकर गुणगान ।।६५।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/६५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : संतांमध्ये महान असलेले नित्य अनादि सद्गुरू अमरलोकातून येऊन ब्रह्मविद्येचा उपदेश करतात. ऋषी, मुनी, देवता आणि मनुष्यगण त्यांच्या उपदेशाने तत्त्वज्ञान प्राप्त करून सुख-शांती प्राप्त करतात. तसेच त्यांची महिमा वेद मंत्रद्रष्टा ऋषीगण गातात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी

अनेकपणात प्रत्येक जीव निरनिराळ्या मतांचा असु शकतो. तत्वज्ञानाचा विचार केला तर अनेक ग्रंथात तर मतमतांतरे आणि ते भिन्नपणा हे स्पष्ट पणे अनुभवास येतो. प्रपंचातील व्यवहार आणि परमार्थात वावरणाऱ्या बुध्दी चा व्यापार यांच्या मध्ये एकवाक्यता नाही. ऋषीमुनी वेगवेगळे विचार मांडतात.त्यांना आत्मचिंतनात जे जे सुचले ते ते त्यांनी मांडले. समर्थांचे विचार बहुमोलाचे विचार आपण आचरणात आणण्याचा विचार करायला हवा. माणूस हा समाजाच्या विविध स्तरातील लोकांना कोणत्या ना कोणत्याही कारणाने भेटत असतो. तेव्हा माणसाच्या आयुष्यात भलेही लोक येतात आणि बुरेही लोक येतात ते कसे किंवा त्या लोकांना काही अनुभव येतात. त्या चांगल्या वाईट अनुभवातून शिकत वाट काढत पुढे जायचे असते.त्यासाठी सत्याची कास कधीच सोडायची नाही. व या अनुभवातून माणसाने काय शिकलं पाहिजे म्हणजे आपल्या आयुष्याचा बॅलन्स नीटपणे साधला जाईल असा विचार करणा-या लोकांच्या साठी हा शून्यत्वनिरसन समास बेतला आहे. (खरं तर प्रत्येक प्रापंचिक माणसाने विचार करून वागायला हवे.) खरं बघायला गेलं तर आजच्या पिढीलाही प्रचंड आव्हानांना तोंड देत देत जीवन जगायचे आहे.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# लीन माणसाला भगवंत लवकर साधेल

आधुनिक केसरी

नामस्मरण करायचे ते अभिमान टाकून करीत जावे. परमेश्वराला अनन्यशरण जाऊनच त्याचे नाम घेत जावे. पुष्कळ वेळा, आपण साधन करू लागलो म्हणजे आपल्याला अभिमान चढू लागतो, आणि त्यामुळे साधन व्यर्थ होते. संताकडे जाताना आपण मनामध्ये काही एक बरोबर घेऊन जाऊ नये; किंवा काही नेलेच तर भगवंताचे प्रेम न्यावे. आपण प्रपंचाचे प्रेम आणि अभिमान बरोबर घेऊन जातो आणि मग, एकावर एक लिहिलेले जसे वाचता येत नाही तशी अवस्था होते. एखादी वस्तू आपल्याला हवी असे वाटल्यावर आपण तिच्या प्राप्तीविषयी विचार करू लागतो. म्हणूनच पहिल्याने, भगवंत हवा असे आपल्याला वाटले पाहिजे. त्यानंतर त्याच्या प्राप्तीच्या साधनांचा अभ्यास करायला पाहिजे. हा अभ्यास मनाच्या कष्टाचा आहे. क्रोधाला बाहेर येऊ देण्यापेक्षा, क्रोध गिळणे यात जास्त श्रम आहेत. असे करण्यामध्ये आज कष्ट आहेत हे खरे, पण पुढे मात्र सुख आहे हे



निश्चित. वागण्यात आणि चालण्यात आपण सावधगिरी बाळगावी; नको ते टाळावे. अनन्यतेला पैसा लागत नाही, विद्या लागत नाही; त्याला फक्त आपली अभिमानवृत्ती बाजूला ठेवावी लागते. भगवंताचे होण्यासाठी अंगी लीनता आलीच पाहिजे. लीन माणसाला भगवंत लवकर साधेल. लीनतेमध्ये बाकीचा विसर पडून भगवंत तेवढा शिल्लक राहतो. जो वृत्तीने लहान आहे त्याला भगवंत लवकर वश होतो. मनुष्य मोठा असून लहानासारखा वागला तर ते फार चांगले असते. मनाने मात्र आपण बळकट बनले पाहिजे. आपण स्वतःशी चोवीस तास उघडा व्यवहार करावा. भगवंताने आपल्याला केव्हाही जरी पाहिले तरी आपल्याला लाज वाटता कामा नये. आपले वागणे असे असावे की भगवंताची आस मनामध्ये वाढत जाऊन, तिचे पर्यवसान ध्यासामध्ये व्हावे. रात्री जे स्वप्न पडावेसे वाटते ते दिवसभर करावे. यासाठी आपली वृत्ती नामामध्ये गुंतवून ठेवावी. 'असावे सर्वांत पण नसावे कोणाचे' अशा वृत्तीने जो राहील त्याला लवकर परमार्थ साधेल. देहाच्या उपचारांना जो भुलतो तो भगवंताला अगदी विसरलेला असतो. पण ज्याचे अनुसंधान मजबून असते त्याला जगातल्या ऐश्वर्याची किंमत नसते. पैशाची वासना आणि लौकिकाची लालसा माणसाला भगवंतापासून दूर नेतात. त्यांच्या तावडीत सापडता कामा नये. लोकेषणा आणि धनेच्छा या दोन्ही गोष्टींचा संबंध प्रपंचात वावरत असताना येणारच. तो टाळता येणे कठीण आहे. पण ज्याला भगवंताचे प्रेम पाहिजे आहे त्याने त्यांचा गुणधर्म ओळखून त्यांना वापरावे, म्हणजे त्यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष त्याला बाधणार नाहीत.

# साईबाबा

साईबाबांचे भक्त भारतात आणि भारताबाहेरही फार मोठ्या प्रमाणात आहेत. ठिकठिकाणी बाबांची मंदिरे उभारण्यात आली आहेत. त्यांच्या भक्तांच्या म्हणण्यानुसार ते अवतारी पुरुष होते. कुणी त्यांना दत्ताचा अवतार मानत तर कुणी विष्णूचा कुणी शिवाचा. बाबांच्या भक्त समुदायात सर्वच जातीधर्मांच्या लोकांचा समावेश होतो. यामध्ये प्रामुख्याने हिंदू व मुस्लिम धर्मीय आहेत. मुस्लिम धर्मातही सुफी संतांमध्ये साई बाबांना मानाचे स्थान आहे.



शुक्रवार, २९ सप्टेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ५८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 29 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-58 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# आपला लालफिती कारभार सुधारा; अन्यथा तीव्र आंदोलन छेडू

## जिल्हा संघटक शिवसेना डॉ.गोपाल बच्छिरे यांचा जिल्हाधिकाऱ्यांना इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** आपला लालफिती कारभार सुधारा अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा तहसीलदार मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना डॉ.गोपाल बच्छिरे जिल्हा संघटक शिवसेना उ.बा.ठा.कडून देण्यात आला. मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंदरस्ते योजने अंतर्गत २३ डिसेंबर २०२२ रोजी योजना विभाग मंत्रालय मुंबई कडून शासन निर्णयानुसार अशा निर्णयाच्या पान क्रमांक तीनवर व अनुक्रमांक ३४ नुसार लोणार ते वेणी पाणंदचा दोन किलोमीटरचा रस्ता दिनांक २४ डिसेंबर २२ रोजी शासनाने मंजूर केलेला आहे.शासनाच्या परिशिष्ट अ च्या अटी शर्तीनुसार शेत पालन रस्त्याचा महसूल विभागाच्या संबंधित गाव नकाशामध्ये रस्ता अस्तित्वात आहे. सदिल रस्त्यासाठी ग्रामपंचायतीने न हरकत ठराव केलेला आहे. सदरील रस्ता हा इंग्रज काळापासून आहे यात कोणाचीही वैयक्तिक मालमत्तेस हानी पोहोचत नाही. या पानंदरस्त्यासाठी भूसंपादनाची गरज नाही. सदरील पानंद रस्त्याविषयी कोणतीही न्यायालयीन वाद नाही. सदरील पानंद रस्ता हा केवळ मातोश्री ग्राम समृद्धी शेत पानंद रस्ते योजनेअंतर्गतच मंजूर आहे. या सर्व बाबी सुस्पष्ट असताना नऊ महिने होऊन गेले या शासन निर्णयस परंतु आपल्याला लाल फिती कारभारामुळे सदरील रस्त्याचे काम रखडलेले आहे. सदरील लोणार वेणी दोन किलोमीटर पाणंद रस्त्याचे काम येत्या आठ दिवसात सुरु न झाल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने शिवसेना स्टाईलने आंदोलन



छेडूत या दरम्यान कायदे व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवल्यास यास सर्वस्व आपण जबाबदार असाल याची प्रशासनाने गांभीर्याने नोंद घ्यावी, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बुलढाणा जिल्हा संघटक डॉ.गोपाल बच्छिरे यांनी शेकडो शिवसैनिकांसमवेत दिला.

याप्रसंगी अँड. दीपक मापारी तालुका प्रमुख, गजानन जाधव सर शहर प्रमुख, कैलास अंभोरे तालुका संघटक, श्रीकांत नागरे तालुका उपप्रमुख, परमेश्वर दहातोंडे तालुका उपप्रमुख, विजय मोरे सरसंचालक कृ. ऊ.बा.स.,तेजराव घायाळ संचालक कृ. ऊ.बा.स.,शाम राऊत माजी नगरसेवक, तानाजी मापारी शहर संघटक, जीवनभाऊ घायाळ युवा तालुकाधिकारी,सुदन अंभोर सर शिवसेना नेते,गोपाल मापारी शिवसेना नेते,
लुकमान कुरेशी शहर उपप्रमुख,उमर सय्यद तालुकाप्रमुख अल्पसंख्यांक, लूकमान कुरेशी शहर प्रमुख, प्रसेनजित बछिरे, एड खीजर अली तलत अली, किसन आघाव, रमेश भानापुरे, बंडूभाऊ जोगदंड, गफार शहा, लालूभाई शेख, वसीम शेख, अजीम सय्यद, शहाबाज अली शेख मतीन, शेख फैयाज शेख सद्दाम, यांच्या सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# सावंगी येथे किन्नराचे सोंग घेऊन व्यापाऱ्यांचे लूट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील मुख्य बाजार पेठ मधे बुलढाणा -जळगाव येथील टोळक्याने किन्नरचे सोंग धारण करुन व्यापाऱ्यांकडून जबरदस्तीने पैसे हिसकावत दहशत निर्माण केल्याने ग्रामस्थांकडून त्यांची जबर धुलाई करुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



बाजार सावंगी ता.खुलताबाद येथे दि.२८सकाळी बुलढाणा -जळगांव येथील एक टोळकं रिक्षाने जे (किन्नर नसताना) किन्नर चे सोंग घेऊन दारु पिलेल्या अवस्थेत काही गावत तर काही मुख्य बाजार पेठ मधे भिक मागु लागले यात व्यापाऱ्याने जर खुशीने पाचदहा रुपये दिले तर ते न घेता जबरदस्तीने गलल्यातून पाचशे हजार रूपये काढुन भाईगिरी दादागिरी करत होते, असे प्रकार दोनचार ठिकाणी त्यांनी केले. परंतु ताजनापूर फाट्यावर पंक्चरच्या दुकानात व्यापाऱ्यांने दहा दिल्यावर ते न घेता गल्ल्या तून हजार रूपये काढुन उलट व्यापाऱ्यासंग भाईगिरी करु लागल्याने मालकाने पाहिले व त्याला धरले व विचारपूस केल्यावर उलट तोच भाईगिरी वर उतरला तो पर्यंत शेंकडों नागरिक जमा झाले तो पिलेला असल्याने दादागिरी करत असल्याने त्याला ग्रामस्थांनी चांगलेच तुडवले व पोलिसाच्या ताब्यात दिले. तेव्हा नागरिकांनी एकच तौबा गर्दी केली होती.गर्दी बघता पोलिसांनी गर्दी पांगवली. किन्नरचा सोंग घेणाऱ्या टोळक्याने यापूर्वी अनेक ठिकाणी लुटमारचा प्रकार केल्याचे समोर आले. टोळक्याला पोलिसांच्या ताब्यात दिल्यावर त्यांनी तपास सुरु केला.मात्र भाईगिरी मुळे नागरिक चिडल्याने जबर धुलाई केली.पोलीस पुढील तपास करत आहे.

# वाशिम येथे स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे उद्या चौदावे पुष्प

## सुधाकर इंगोले यांचे 'विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास'वर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज


**वाशिम :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या



स्मृतिप्रीत्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे चौदावे पुष्प माजी उपप्राचार्य, आदर्श कॉलेज, हिंगोली, अध्यक्ष बालकल्याण समिती सुधाकर इंगोले हे 'विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास' या विषयावर गुंफणार आहेत. श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाशिम येथे शनिवार, दि.30 सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी १२:३० वा. होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. बाबाराव पाटील खडसे यांची उपस्थिती राहणार आहे. या व्याख्यानाचे उद्घाटक म्हणून विधान परिषद सदस्य आ. अॅड.



सुधाकर इंगोले (व्याख्याते)



आ. अॅड. किरणराव सरनाईक



मा. बाबारावजी पाटील खडसे

किरणराव सरनाईक, तर प्रमुख अतिथी म्हणून मा.आ. विजयराव जाधव, आ. अमितभाऊ झनक प्रा. भाऊसाहेब काळे, (अध्यक्ष, वाशिम जिल्हा संस्था संचालक संघटना), माधवराव अंभोरे (अध्यक्ष मराठी पत्रकार परिषद), पांडुरंग ठाकरे (अध्यक्ष, जिजामाता विद्या मंदीर, अनसिंग), प्राचार्य विनोद नरवाडे, (जिल्हाध्यक्ष मुख्याध्यापक संघ वाशिम), प्राचार्य अरुणराव सरनाईक.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृत्यर्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व वाशिम जिल्हा संस्थाचालक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक नारायणराव काळबांडे, (सचिव संस्थाचालक संघटना, वाशिम), संयोजक पत्रकार वसंत खडसे, अरविंद देशमुख, रुपेश बाजड, डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.



# विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांनी रंग भरला

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणूक पाच वाजे पासुन शांततेत सुरु झाल्या शहरातील खंडोबा मंदिर परिसरात सर्व मानाचे गणपती रांगेत मिरवणूकीत पैठण करानी पारंपरिक वाद्ये तसेच गणपती समोर जिवंत देखावे सादर करून भक्तांची मने जिंकली,पैठण शहरातील 17 वर्षाची परंपरा असलेल्या सिध्दीविनायक व्यापारी गणेश मंडळाच्या सर्वच गणेश भक्तानी गणरायाला निरोप दिला.याप्रसंगी गणेश भक्तासाठी खास शिंगोरी आमटी,भाकरीचा महाप्रसाद ठेवण्यात आला होता.याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष किशोर चौहान,अध्यक्ष रामेश्वर सुसे,दिपक लखमले,सचिन उंडाळे,सुनील रासणे,दिपक लिखीते,अशोक चांडक,पवण लोहीया,बलराम लोळगे सह गणेश भक्त विसर्जन मिरवणुकीत सहभागी होत. यावेळी पैठण पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरिक्षक संजय देशमुख यांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. गणेश विसर्जन मिरवणुकीत पावसाने हजेरी लावल्याने गणेश भक्त चिंब होत नाचुन आंनद घेत होते.



## हरितक्रांतीचे जनक

आधुनिक केसरी

१९६० च्या दशकात भारतात आलेल्या हरितक्रांतीचे जनक मानले गेलेले ज्येष्ठ शेतीतज्ज्ञ व सुप्रसिद्ध वैज्ञानिक एम. एस. स्वामीनाथन यांचे गुरुवारी निधन झाले आहे. ते ९८ वर्षांचे होते. देशातील अल्प उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी तांदळाच्या विविध प्रकारच्या उच्च उत्पादन देणाऱ्या प्रजाती तयार करण्यातही त्यांनी मोलाची भूमिका बजावली होती. त्यांच्या नोकरीच्या काळात त्यांनी प्रशासनात अनेक महत्त्वाच्या पदांवर आपल्या कामगिरीचा ठसा उमटवला होता. २००४ साली स्वामीनाथन यांना राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही नियुक्त करण्यात आलं होतं. एम. एस. स्वामीनाथन यांनी १९६१ ते १९७२ या ११ वर्षांच्या काळात भारतीय कृषी संशोधन संस्थेचे संचालक म्हणून काम पाहिले. १९७२ ते १९७९ या काळात ते आयसीएआरचे महासंचालक आणि केंद्रीय कृषीय विभागाचे सचिव म्हणून काम पाहात होते. पुढच्याच वर्षी त्यांची कृषी खात्याचे सचिव म्हणून नियुक्ती झाली. १९८० ते ८२ या तीन वर्षांत त्यांनी नियोजन आयोगाचे उपसंचालक आणि त्यानंतर सदस्य म्हणून कार्यभार सांभाळला. १९८२ ते ८८ या ७ वर्षांत त्यांनी इंटरनॅशनल राईस रिसर्च इन्स्टिट्युटचे महासंचालक म्हणूनही काम केले. एम. एस. स्वामीनाथन यांनी १९६१ ते १९७२ या ११ वर्षांच्या काळात भारतीय कृषी संशोधन संस्थेचे संचालक म्हणून काम पाहिलं. १९७२ ते १९७९ या काळात ते आयसीएआरचे महासंचालक आणि केंद्रीय कृषीय विभागाचे सचिव म्हणून काम पाहात होते. पुढच्याच वर्षी त्यांची कृषी खात्याचे सचिव म्हणून नियुक्ती झाली. १९८० ते ८२ या तीन वर्षांत त्यांनी नियोजन आयोगाचे उपसंचालक आणि त्यानंतर सदस्य म्हणून कार्यभार सांभाळला. १९८२ ते ८८ या ७ वर्षांत त्यांनी इंटरनॅशनल राईस रिसर्च इन्स्टिट्युटचे महासंचालक म्हणूनही काम केले. २००४ साली वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय शेतकरी आयोगाच्या अध्यक्षपदी स्वामीनाथन यांची नियुक्त करण्यात आली. स्वामीनाथन आयोगानं २००६ साली त्यांचा सविस्तर अहवाल केंद्र सरकारला सादर केला. या अहवालात, शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी मिळणारा हमीभाव हा मालाच्या उत्पादनाच्या खर्चाच्या किमान दुप्पट असावा अशी शिफारस स्वामीनाथन आयोगाने केली होती. एम. एस. स्वामीनाथन यांचा १९८७ साली पहिल्या विश्व अन्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यानंतर स्वामीनाथन यांनी चेन्नईमध्ये एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनची स्थापनाही केली.

## सरकारी शाळांची घटती संख्या चिंताजनक!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**गेल्या तीन वर्षांत देशभरातील सरकारी शाळांची संख्या सुमारे ६२ हजारांनी घटली आहे. या शाळा एकतर बंद करण्यात आल्या आहेत किंवा इतर शाळांमध्ये विलीन करण्यात आल्या आहेत. त्याचवेळी, गेल्या दोन वर्षांत खासगी शाळांची संख्या सुमारे १५ हजारांनी वाढली आहे. अधिकृत आकडेवारीने याला दुजोरा दिला आहे. गेल्या दोन वर्षांत सरकारी अनुदानित शाळांच्या संख्येतही किंचित घट झाली आहे. काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारने UDISE+ अहवाल प्रसिद्ध केला होता. UDISE+ म्हणजे युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टम फॉर एज्युकेशन प्लस.ते केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येते. जे दरवर्षी देशभरातील शाळांची संख्या, मुलांची नोंदणी, शिक्षकांची संख्या, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर, शाळांमधील लिंगभेद याविषयी अहवाल प्रसिद्ध करते.**

UDISE+ चा २०२०-२१ अहवाल दाखवतो की देशात १५ लाखांहून अधिक शाळा आहेत. यामध्ये सरकारी, निमशासकीय आणि खासगी शाळांचा समावेश आहे. या शाळांमध्ये २६.५ कोटींहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. गेल्या तीन वर्षांच्या UDISE+ च्या अहवालावरून असे दिसून आले आहे की देशातील सरकारी शाळांची संख्या सातत्याने कमी होत आहे. अहवालानुसार, सध्या देशभरात १० लाख ३२ हजार ४९ सरकारी शाळा आहेत, त्यापैकी ६२ हजार ४८८ शाळा गेल्या तीन वर्षांत कमी झाल्या आहेत.

केंद्र सरकारने जुलै २०१९ मध्ये लोकसभेत सरकारी शाळांच्या संख्येची माहिती दिली होती. तेव्हा शाळांची संख्या १०.९४ लाख असल्याचे सांगण्यात आले. सरकारने ही आकडेवारी UDISE (२०१७-१८) च्या अहवालाच्या आधारे दिली होती. मात्र, सरकारने आपल्या नवीन अहवालात सरकारी शाळांमधील कपातीबाबत कोणतीही वेगळी माहिती दिलेली नाही. तसेच याचे कारणही स्पष्ट केलेले नाही.

शिक्षणावर काम करणारे लोक सरकारी शाळांची घटती संख्या हे शिक्षणाच्या खाजगीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल मानतात. सरकार अनेक दिवसांपासून बंद आणि विलीनीकरणाच्या नावाखाली सरकारी शाळा बंद करत आहे. यामागील तर्क असा आहे की, शाळांमध्ये मुले कमी आहेत, त्याचा खर्च परवडणारा नाही. त्यामुळे त्यांचे जवळच्या शाळेत विलीनीकरण करावे. शिक्षण खाजगी हातात सोपवण्याचा सरकारचा बहुतांश प्रयत्न आहे. शाळा बंद करणे म्हणजे मुलांच्या हक्कांचे थेट उल्लंघन आहे.

एकीकडे सरकारी शाळांची संख्या सातत्याने कमी होत आहे, तर दुसरीकडे गेल्या दोन वर्षांत खासगी शाळांची संख्या सुमारे १५ हजारांनी वाढली आहे. UDISE+ अहवालानुसार, २०१८-१९ मध्ये देशातील एकूण खाजगी शाळांची संख्या ३.२५ लाखांहून अधिक होती, जी २०२०-२१ मध्ये ३ लाख ४० हजारांहून अधिक झाली आहे. विशेष म्हणजे शाळा बंद किंवा विलीनीकरणाची आकडेवारी सरकार उघड करत नाही, जेणेकरून लोकांना त्याचे तर्क समजू शकतील. केंद्र सरकार प्रत्येक वेळी असे म्हणत.आहे.की हा राज्यांचा प्रश्न आहे. परंतु केंद्र स्वतः वारंवार विलीनीकरणाच्या सूचना देत आहे. दोन्ही मार्ग कसे असू शकतात ? जमिनीवरचा आमचा अनुभव असे दर्शवितो की शाळा बंद असताना पालकांना समस्यांना सामोरे जावे लागले आहे. काही अंतरावर शाळेत जाण्याने मुले गळतीचा धोका वाढतो. ज्या सरकारी शाळांची पटसंख्या सर्वाधिक घटली आहे, त्यात प्राथमिक



शाळांची संख्या अधिक आहे. जुलै २०१९ मध्येच सरकारने देशातील प्राथमिक शाळांची संख्या ६ लाख ९८ हजार ८६१ असल्याची माहिती दिली होती. ही संख्या आता ६लाख ४० हजार ४६१ इतकी कमी झाली आहे. २०१६ मध्ये सरकारी सचिवांच्या गटाने शिफारस केली होती की ज्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या खूपच कमी आहे, त्या शाळा जवळच्या दुसऱ्या शाळेत विलीन कराव्यात.आता राज्य सरकारने कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा घाट घातला असून त्या साठी समूह शाळेची संकल्पना समोर आणली आहे.

तथापि, अलीकडेच केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने एका आरटीआयला उत्तर देताना सांगितले होते की, शिक्षण हे राज्यघटनेच्या समवर्ती यादीत येते. आणि शाळांचे व्यवस्थापन राज्य सरकारच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे शाळा बंद करणे किंवा उघडणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे.

राज्य सरकारी शाळांच्या काही भागासाठी केंद्रही निधी देते. मित्र रंजन सरकारी शाळांच्या घटत्या पटसंख्येचा संबंध शिक्षकांच्या कमतरतेशीही जोडतात. सरकारी शिक्षकांची संख्याही एका वर्षात घटली आहे. २०१९-२० मध्ये सरकारी शाळांमध्ये एकूण शिक्षकांची संख्या अंदाजे ४९ लाख ३८ हजार होती. तर २०२०-२१ मध्ये ते कमी होऊन ४९ लाख २७ हजार झाले. देशभरात ११ लाखांहून अधिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत. हा आकडा सरकारने गेल्या वर्षी संसदेत दिला होता. विविध राज्यांमध्ये शिक्षक भरतीची मागणी होत आहे. जर सरकारने शाळा बंद केल्या किंवा विलीनीकरण केले, तर तो आहे. तसेच शिक्षकांच्या कमतरतेचा समतोल साधण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे सरकारची आकडेवारीही बरोबर दिसून येईल.गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले होते की, सुमारे १५ कोटी मुले शाळाबाह्य आहेत. कोविड काळात मुलांचे गळतीचे प्रमाणही वाढले. या काळात प्राथमिक स्तरावरील नावनोंदणीतही घट दिसून आली. UDISE अहवालानुसार, २०१९-२० च्या तुलनेत २०२०-२१- मध्ये पूर्व-प्राथमिक स्तरावरील नावनोंदणी २०.२ लाखांनी कमी झाली आहे. तर वर्ग-१ मध्ये ही संख्या १८.८ लाखांनी कमी झाली.

**यूपीमध्ये २६ हजारांहून अधिक शाळा कमी झाल्या :** गेल्या महिन्यात टाईम्स ऑफ इंडियाचा एक रिपोर्ट आला होता. बिहारमध्ये १८८८ प्राथमिक शाळा बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यात समग्र शिक्षा अभियानांतर्गत प्रकल्प मान्यता मंडळाच्या अहवालाचा हवाला देत या शाळांच्या इमारतीसाठी शासनाकडून जमीन मिळू शकलेली नाही, असे म्हटले होते. त्यामुळे सद्यस्थितीत शाळा चालवणे अवघड झाले होते. गेल्या १०१५ वर्षांपासून या शाळा कम्युनिटी हॉलमध्ये, झाडाखाली किंवा इतर ठिकाणी सुरू होत्या. मात्र, राज्याचे शिक्षणमंत्री विजय कुमार चौधरी यांनी त्या बंद केल्या नसून इतर शाळांमध्ये विलीन करण्यात आल्याचे सांगितले होते.

कोविड-19 महामारीच्या काळात देशात शाळा झपाट्याने बंद किंवा विलीन करण्यात आल्या आहेत. ते म्हणाले की कोविड संकटाच्या दृष्टीकोनातून पाहिले तरी, यावेळी लहान शाळांची गरज आहे, जिथे लहान मुले सामाजिक अंतर ठेवून अभ्यास करू शकतील.

गेल्या तीन वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकली तर प्राथमिक शाळांची संख्या उत्तर प्रदेशात सर्वाधिक कमी झाली आहे. २०१७-१८मध्ये राज्यातील सरकारी प्राथमिक शाळांची संख्या १.१४ लाख होती. जे २०२०-२१ मध्ये ८७ हजार ८९५ यंत कमी झाले. त्याचप्रमाणे झारखंडमधील प्राथमिक शाळांची संख्या सुमारे तीन हजारांनी घटली आहे. ओडिशातही ही संख्या अडीच हजाराच्या आसपास आहे तर महाराष्ट्रात एक हजार आहे. मात्र, राजस्थान, गुजरात, तामिळनाडू, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये सरकारी प्राथमिक शाळांची संख्या वाढली आहे.

**शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन ?**

शाळा बंद झाल्यामुळे किंवा विलीन झाल्यामुळे जवळच्या मुलांना इतर शाळांमध्ये जाण्यासाठी लांबचा प्रवास करावा लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शिक्षण हक्क कायदा-२००९सांगते की ६-१४वर्षे वयोगटातील सर्व मुलांना शेजारच्या शाळेत मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले जाईल. कायद्यानुसार, प्राथमिक शाळा (इयत्ता १ ते ५) विद्यार्थ्यांसाठी एक किलोमीटरच्या परिघात शाळा असणे आवश्यक आहे. तर इयत्ता ६ वी ते ८वी साठी ही त्रिज्या ३ किलोमीटर आहे. यामुळें अनेक मुले शाळाबाह्य राहण्याचा मोठा धोका निर्माण होऊ शकतो. मुलींसाठी हे अधिक कठीण होणार आहे. आरटीई कायद्याद्वारे मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेल्या जबाबदारीपासून सरकार दूर होत आहे. अनेक मुले औपचारिक शालेय शिक्षणापासून दूर जाऊ शकतात. शाळा बंद झाल्यामुळे, त्याहूनही अधिक म्हणजे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारने काम केले पाहिजे. आताही राष्ट्रीय स्तरावर केवळ २५.५० टक्के शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची पूर्ण अंमलबजावणी झाली आहे. त्यात गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षणाची हमी देण्यासाठी काम करण्याची गरज आहे. सरकारी शाळासरकारच्या अशा पावलांमुळे समाजातील खालच्या वर्गाचे नुकसान होते. कारण सरकारी शाळांमध्ये दलित आणि मागास समाजातील मुले जास्त आहेत, ज्यांना मूलभूत शिक्षणाची सर्वाधिक गरज आहे. समताशील समाज घडवायचा असेल तर सरकारने सरकारी शाळा कमी करण्याऐवजी वाढवायला हव्यात. जेणेकरून सर्वांना मोफत आणि दर्जेदार शिक्षण मिळू शकेल.

## तरच मन:स्थिती भक्कम राहते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवनात बहुतांश घटना घडामोडी ह्या आपल्या मनाविरुद्ध घडत असतात पण ह्याच घडामोडी पचवता आल्या नाहीत तर मग त्याचा परिणाम अंतिमतः डिप्रेशन मध्ये होतो .जीवन वाटत तितकं सोपं नसतं जीवनात बरंच काही विसरता आल पाहिजे विसरायला शिकलं नाही तर पुढील प्रवास डिप्रेशन च्या दिशेने होत असतो .याची जाणीव ठेवून जीवन हित समजलं पाहिजे.समुद्रा कितीही खवळला तरी नावाडी परफेक्ट असेल तर नौका पैलतीराला जाणारच तसंच जीवनात कितीही वादळं संकट अडचणी समस्या आल्या तरी आपल्या मनातील त्रास दायक बाबी विसरायला शिकल तर आयुष्यच गणित परफेक्ट बरोबर जुळत.**

म्हणून मनात साठवण सोपं असतं पण विसरण हे अवघड असतं आणि हेच कठिण अवघड काम ज्याला जमलं त्याला जीवन प्रभावित करू शकत नाही. आपलं मन हे आपलं हितकारक आहे .तसेच ते अहितकारक सुद्धा आहे. मन आपला मित्र आहे. तर हेच मन आपलं शत्रु पण आहे. सदैव, चंचल अस्थिर अनियंत्रित असणार मन हे जगातील सगळ्यात मोठे भांडार आहे. ज्या मध्ये सृष्टी वरील सगळ्या चांगल्या आणि वाईट बाबी एकत्र साठविल्या जातात आणि मनाची विशालता एवढी मोठी आहे कि कितीही साठवलं तरी जागा अपुरी पडत नाही.मग आपलं मन हे किती मोठं भांडार, कोठार आहे.याची कल्पना करणं आजपर्यंत तरी कोणाला जमलं नाही. पण या कोठारात आपण काय साठवले हे आपल्याला साठवताना लक्षात येत नाही कळत नाही. पण जेव्हा परिणाम जाणवतात तेव्हा मग आपण चिंतन करतो आणि मग लक्षात येतं की आपली साठवण करण्यात गडबड झाली आहे. मग भांडारात जगा खुप शिल्लक आहे. म्हणून काहीही साठवायचे का? तर नक्कीच नाही. कारण या साठवणूकीमुळे आपलं चांगलं जीवन प्रभावित होत. म्हणून सगळ्यात प्रथम आपल जीवन आपल्याला प्रभावित होऊ देयच नसेल तर आपल्या मनात काय साठवायचे आणि नेमकं काय विसरायचे ही कला कौशल्य,हे ज्ञान आपल्याला अवगत झाले पाहिजे. जेणेकरून कोणत्याही बाबींचा प्रभाव आपल्या जीवनशैलीवर होणार नाही आणि आपलं जीवन प्रभावित होणार नाही. ही दक्षता काळजी जवळपास प्रत्येकाला घेता आलीच पाहिजे जीवन जगताना अनेक विषय बाबी अशा असतात की त्यामध्ये आपली इच्छा असली काय किंवा नसली काय तरी सुद्धा आपल्याला नाईलाजाने का होईना पण अनेक बदल हे स्वीकारावे लागतात. अनंत अडचणी, नानाविध दुःख, निसर्गाचा अन अपेक्षित कहर, मायावी जगातील, दगाफटका अशा अनेक कारणांमुळे जीवन सतत प्रभावित होत असतं. अनंत असे विषय असतात की त्यामुळे आपलं जीवन प्रभावित होत असतं. म्हणून आपल्या मनात नेमकं काय साठवायचे आणि नेमकं काय विसरायचे हे ज्याला योग्य पद्धतीने जमलं त्याच्या जीवन प्रभावित होत नाही. मुळात आपण इतरांच्या संदर्भात कसं वागावं हे खूप महत्वाचे आहे.आणि यावरच आपलं जीवन प्रभावित होत असतं.कोणावर किती विश्वास, ठेवायचा कोणाला किती महत्व द्यायचे, कोणाला किती जवळच समजायचा, अथवा ठेवायचा, त्याच बरोबर कोणासोबत किती जवळीकता असली पाहिजे. आपल्या लेखी कोणाच महत्व किती असल पाहिजे, हे समजलं पाहिजे.कारण पुढं उद्‌भवणारा त्रास सुद्धा या बाबींमुळे होत असतो. कारण त्या दिलेल्या महत्वाचं योग्य मुल्य मिळालं नाही. किंवा चुकीच्या ठिकाणी चुकीचे मुल्यमापन झाले तर मग नको तो त्रास होयला सुरुवात होते. यामध्ये काही दुमत नाही. म्हणून निर्णय चुकला नाही पाहिजे. आणि जरी चुकला तरी तो तात्काळ दुरूस्त करता आला पाहिजे. किंवा आपलं जीवन प्रभावित होणार नाही एवढी दक्षता घेता आली पाहिजे. किंवा जास्तीत जास्त गंभीर परिणाम चुकीच्या निर्णयाचे होऊ न देणे हेच जीवनातील महत्वाचे ज्ञान आहे. म्हणून मग व्यवहार कोणताही असू द्या सार्वजनिक क्षेत्रातील असो की खाजगी क्षेत्रातील सार्वजनिक जीवनातील असो किंवा व्यक्तिगत पातळीवरील असो. आपलं, ज्ञान, आपली समज उमज आणि आपली मर्यादा, हिच आपली रक्षक असते. म्हणून आपण जगात फिरताना वावरताना अनेक बाबी पाहतो अनुभवतो अनेक चांगले वाईट दृष्य पाहतो. विचार ऐकतो. जे ऐकलं पाहील अनुभवलं ते सगळंच आपल्या साठी चांगलं असेल असं नाही काही चांगलं असतं काही वाईट असतं काही भयानक असत तर काही महा भयानक असत. आता यापैकी जे चांगलं आहे. ते आपल्यासाठी हितकारक असते ठरेल म्हणून ते मनात साठवण उत्तम पण जे आपल्या साठी आपल्या भावी जीवनासाठी अहितकारक असेल व आपलं जीवन प्रभावित करणार ठरेल किंवा ठरू पाहत आहे ते मनात साठवण योग्य नाही. ते आपल्याला वेळीच विसरता आल पाहिजे. जेणेकरून आपल व्यवस्थित जीवन प्रभावित होणार नाही. म्हणून आपलं जीवन प्रभावित होऊ देयच की नाही हे सर्वस्वी आपल्यवर अंवलबून असतं. नको असलेलं आपण साठवतो आणि आवश्यक असलेल विसरतो. हा मानवी स्वभाव पण एकंदरीत असं न करता आपल्याला जीवनाला प्रभावित करणाऱ्या बाबी ह्या आपल्याला मनातून विसरता आल्या पाहिजेत त्यासाठी फार मोठी गोष्ट करण्याची आवश्यकता नाही मन सकारात्मक बाबी मध्ये व्यस्त ठेवा. चांगल्या विचारांच्या चांगल्या व्यक्तिच्या संपर्कात रहा. नक्कीच सकारात्मक परिणाम दिसतील यामध्ये शंका नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# विविध मागण्यांसाठी धनगर समाजाचे रस्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बदनापूर :** धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती लागू कराव्यात या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील बदनापूर येथे जालना- छत्रपती संभाजी नगर हायवेवर भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी मा. लहुजी शेवाळे, कैलास चोरमारे, दत्ताभाऊ म्हेत्रे, निवृत्ती देहडे, सोपान भांड,पांडुरंग कोल्हे, मच्छिंद्र होळकर, कृष्णा खरात, धनराज सातपुते, कृष्णा कोल्हे यासह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# लोकसभेत ३३टक्के महिला आरक्षण विधेयक पारित झाल्याने महिलांनी केली आरती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक असलेला गणेशोत्सव यंदा शाळेत पहिल्यांदाच गणपती बसवण्यात आला. गेल्या दहा दिवसांपासून विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते आरती आरती करून गणेशोत्सव गेल्या दहा दिवसांपासून अतिशय आनंदाने हर्षोल्हासात साजरा करण्यात येत आहे. गेल्या दहा दिवसांपासून दररोज एका वर्गाने विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी सकाळच्या सत्रातील आरती केली.

यावेळी वेरूळ येथील सर्व क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या हस्ते नुकतेच लोकसभेत ३३% महिला आरक्षण विधेयक पारित झाल्यामुळे अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने आरतीचा मान महिलांना देण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी की नुकतेच लोकसभेमध्ये महिलांना ते ३३ टक्के आरक्षण विधेयक पारित झाले आहे. त्याचा भाग म्हणून वेरूळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वेरूळ परिसरातील कर्तुत्ववान महिलांना आरतीचा मान देण्यात आला. महिलांचे फेटे बांधून स्वागत करण्यात आले. तसेच अनंत चतुर्दशी ची महा आरती करून राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेला सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी सरपंच कुसुमताई पाटील, ग्रा. पं. सदस्य ज्योतीताई सतीश लोखंडे, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष वर्षाताई घोडके, सदस्य अनिता बनकर, मुख्यध्यापिका संगीता पांडे, संगीता दिवेकर, अनिता सुरेश बोरसे, ज्योती पवार, अलका धनेधर, सीमा श्रीकांत भालेराव, ज्योती चंद्रकांत भालेराव, पाटील काकू,सहशिक्षिका मनीषा उदावंत, ,छाया माळी, संगीता देशमुख, अंजली कान्हेड, अर्चना चव्हाण, पल्लवी जयस्वाल, संगीता भागवत कल्याणकर, कावेरी जाधव यांच्यासह महिला, विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सह शिक्षक सुरेश बोरसे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीश देवेंद्र लोखंडे, शेख रियाज, श्रीकांत भालेराव यांनी परिश्रम घेतले.





# मराठवाड्यातील सर्वोत्तम म्हणून औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीची ओळख व्हावी

## हरिभाऊ बागडे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा औरंगाबाद येथील जाधववाडी येथे पार पडली, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सुरुवातीच्या काळापासून ते आजपर्यंतच्या अनेक घटनांची आठवण त्यांनी यावेळी करून दिली. त्याचबरोबर स्वच्छता आणि शेतकऱ्यांनी स्वयंशिस्त पाळण्याबाबत व बाजार समितीने ही शिस्तीचे पालन करण्याकरता अग्रहित राहण्याबाबतच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

भविष्यात मराठवाड्यातील सर्वोत्तम कृषी उत्पन्न बाजार समिती म्हणून औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीची ओळख होण्याकरता सर्व संचालक मंडळ प्रशासन व सभासद सामूहिक प्रयत्न करावे, असे आवाहन यावेळी -हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी औरंगाबाद कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे, उपसभापती मुरलीधर चौधरी, औरंगाबाद भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा संचालक राम बाबा शेळके, पुणे बाजार समिती संचालक दामू अण्णा नवपुते, औरंगाबाद जिल्हा बँकेचे संचालक जावेद पटेल, अभिजीत देशमुख, संचालिका सौ. सुजाता गायके, सौ.जनाबाई ठोंबरे, गणेश राव दहीहंडे, भागचंद ठोंबरे, भागिनाथ नवपुते, पुनम बमने, कैलास उकिरडे, दत्ता उकिरडे, मनोज गायके, कन्हैयालाल जयस्वाल, अब्दुल पठाण, निलेश शेटि, देविदास कीर्तीशहा, महेंद्र खोतकर, सुदाम ठोंबरे, बाजार समितीचे सचिव विजय शिरसाठ, कल्याण गायकवाड, आत्माराम पळसकर, भाऊराव मुळे, मनोज शेजुळ, विठ्ठल सादरे, शिवाजी वाघ, विजय काळे, नानासाहेब पळसकर, रामकिसन भोसले, ज्ञानेश्वर ठोंबरे, जगन्नाथ रिठे, सजन बागल, प्रकाश चागुलपाय, श्रीमंत दांडगे,जनार्दन पठाडे, पांडुरंग सोनवणे, विठ्ठल काकडे, दादाराव अवताडे, आगाजी अंभोरे, यांच्यासह मोठ्या प्रमाणावर शेतकरी, सभासद, व्यापारी, हमाल, मापाडी उपस्थित होते.

# दिल्ली येथील पेन्शन शंखनाद महारॅलीला शिक्षक सेनेचा प्रत्यक्ष सहभागासह पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** 1 ऑक्टोंबर 2023 रोजी शिक्षक सेनेचे राज्यध्यक्ष मा.ज.मो. अभ्यंकर साहेब यांच्या आदेशाने शिक्षक सेना अंगीकृत म.राज्य जुनी पेंन्शन हक्क सेना राज्य समन्वयक दिपक पवार यांच्या नेत्रत्वात दि.१ ऑक्टोंबर 2023 रोजी नॅशनल मुवमेंट फॉर ओल्ड पेंन्शन स्कीम या देशव्यापीय संघटनेच्या वतीने दिल्ली येथील रामलीली मैदानावर पेंन्शन शंखानाद महा रॅलीचे आयोजन केले आहे. त्या रॅलीला प्रत्यक्षात सहभागी होऊन पाठींबा देण्यासाठी जात आहे.या देशव्यापी अंदोलनात सहभाग हा DCPS शिक्षक बांधवांच्या भविष्याचा महत्वाचा ज्वलंत जिवन मरनाचा प्रश्न आसल्यामुळे जिते शिक्षकावर अन्याय तिथे तडजोड नाही म्हणून या देशव्यापी चळवळीला नवे बळ पाठींबा देणे गरजेचे आसल्यामुळे राज्यध्यक्ष मा.ज.मो.अभ्यंकर साहेबांच्या आदेशाने राज्यातील राज्य विभाग जिल्हा पदाधिकाऱ्यासह शकडो शिक्षक सैनिक या महा रॅलीआंदोलनांत सहभागी होण्यासाठी जात आहेत तरी जास्ती जास्त शिक्षक बंधू भगिनींने या शंखानाद आंदोलनात सहभागी व्हावे आसे आहवान शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण यांनी केले आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come true..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

# बाप्पाने दिलेली शिकवण!

आधुनिक केसरी

**बाप्पा आपल्या घरी गेला की कोणत्याच गोष्टीत मन लागत नाही. दहा दिवसांचा जल्लोष आणि त्या जल्लोषात आपण इतके रममाण झालेलो असतो की हा क्षण संपूच नये असं वाटतं असतं, पण तरीही प्रथा म्हणून आपल्याला या गोष्टी कराव्या लागतात. रिकामा मखर पाहून अंतःकरण जड होते आणि डोळ्यांतून आसवांच्या धारा वाहू लागतात. सारखी बाप्पांची आठवण होते खरं तर लहान असो वा मोठे ही भावना प्रत्येकाच्या मनी सारखीच मग मी या विषयात अगदी हळवी मला लहानपासून जे वाटायचं ते आजतागायत वाटतं आलं बाप्पांसाठी दहा दिवस देखील कमी आहेत.**

दहा दिवसानंतर का बरं बाप्पपा निघून जातो संपूर्ण वर्षभर मग बाप्पाची वाट पहावी लागते. सकाळी पूजा, आरती, मोदक नैवेद्य या सगळ्याची इतकी सवय होऊन जाते की नंतर फार चुकल्या चुकल्यासारख वाटतं. प्रत्येकवर्षी म्हणजे गेल्या तीन चार वर्षापासून मी क्रमच लावला होता बाप्पांसाठी पत्र लिहायचं, तो पोहला की मग आपण एकटे आहोत, करमत नाही, या सगळ्या गोष्टी सांगून झाल्या की मग तू या दहा दिवसांत दिलेली शिकवण आठवून ती जीवनात उतरवून मी पुढे मार्गक्रमण करणार त्या गोष्टी साध्य करणार असा तुला विश्वास द्यायचे; मात्र यावेळी असं काहीच घडणार नाही नाही म्हणजे तू सांगलेलं तू शिकवलेलं सारं काही मी पूर्ण करणारं त्यातून तुला दिलेलं वचन पाळणार हे सारं मी बाप्पांला सांगणारचं पण तो घरी गेला किंबहुना आपण बाप्पाचं विसर्जन केलं असा विचार करून माझं मन मात्र अस्वस्थ होणार नाही. याचवेळी असं का घडतयं तर ते ही सांगते खरंतर मला असं वाटतं पुस्तकं ही ना आपली मित्र असतात त्यामुळे कुठे कधीही ती वाचली की मन अगदी प्रसन्न होऊन जाते. आपल्याला ती मार्ग दाखवतात. खरं सांगू म्हणजे आपल्या मनात काय चालू असंत हे बाप्पाला बरोबर ठाऊक असतं. त्याच्या लेकरांना कोणत्या गोष्टीने त्रास होते हे तो जाणते असतोच त्यामुळे आपली लेकरं सुखात,



आनंदात राहावी यासाठी तो नेहमीच प्रयत्न करत असतो. माझं दुःख त्याला माहित असणारचं, मला न सोसवणारे माझे अश्रू आणि नंतर पुढचे काही दिवस मी मन लावून कोणतेही काम करणार नाही हे सारं त्याला सवयीने ठाऊक म्हणून माझ्या वाचणात त्याच्याच कृपेने सावकर आणले, ऐरवी सावरकरांचे पुस्तक मी सवडीने हाती घेतले असते. कारण अशी व्यक्तिमत्त्व वाचण्यासाठी वेळ द्यावा लागतो. मनात ती भावना निर्माण व्हावी लागते. आणि माझी जन्मठेव वाचल्यानंतर पुढे लवकर मी त्यांची पुस्तकेही वाचली नसते. कारण त्या एका पुस्तकांतूनच एवढी प्रचंड ऊर्जा मिळाली आणि आपल्या बाहूत शौर्य निर्माण झाल्याचे भासले. आपण या देशासाठी देणं लागतो ही भावना कुठेतरी मला त्यातून मिळाली. म्हणून या सांस्कृतिक वातावरणात मी नक्कीच त्यांची पुस्तके हाती घेतलीचा नसती. पण आपण निव्वळ बोलणारे शेवटी कर्ता करविता तोच आणि या माझ्या विनायकानं त्या विनायकाच्या विचारातून माझे मन आणि बुद्धी यांच्यावरील ही धुसर जळमटे काढून टाकली. मला नवी दृष्टी दिली हे पाहण्यासाठी की जे दिसतं त्याहूनही सत्य वेगळं आहे. कुणि एकाने आपल्याला त्याचआ मत हे परंपरेरूपी ठरवून दिलं म्हणजे पुढे त्या गोष्टीची शहानिशा होत नाही. आणि आपण ते शास्त्र म्हणून करत असतो. बाप्पाच्या बाबतीतही हेच. म्हणून वि.दा.सावकर यांच्या ओळी मलि पटल्या या संदर्भात ते म्हणाले, " अनादी अनंत, खरं तर तो कुठेच जात नाही, इथेच असतो ! प्रतिष्ठापना, विसर्जन हे आपल्या मनाचे खेळ. अनादि, अनंत आणि असीम अशा काळावर अधिराज्य गाजवणांऱ्याना आपण काय बसवणार आणि काय विसर्जित करणार? गणेश, महादेव ही तत्व आहेत सृष्टीतही. विसर्जन तर माणसाचं असतं, आपल्यासारख्या 'तत्व' चिरंतर असतात." हे शब्द माझ्या विरहाच्या ओल्या जखमेवर संजीवनीचं काम करून गेली. म्हणजे बाप्पा इथेच असतो इथेच राहतो तो कुठेही जातं नाही. आपल्या माणसाचे खेळ तो पाहत राहतो. जसं आपल्या लहान पोरीने भातुकलीत बनवलेला चहा आणि स्वयंपाक बाबा जसा मोठ्या आनंदानं आणि चवीने चाखतो. ते केवळ तिच्या डोळ्यांतील ते तजेल हर्ष पाहण्यासाठी अगदी हेच बाप्पा नाही का करतं. आपल्या दहा दिवसाच्या भातुकलीत तो पाहुणा म्हणून येतो. आपण बनवून खाण्यास दिलेले सारे पदार्थ तो मोठ्या आवडीने चाखवतो. मग फसलेले मोदक असो वा कधी ताटात कमी पडलेले मीठ असो. हे सारं काही तो करतो. दहा दिवसात आपण खेळ संपवतो. बाप्पांच विसर्जन करतो. आणि दुःखी होतो. पण तो सांगतो अरे मी तुझ्यासोबत आहे तू केवाळ त्या मातीच्या मूर्तीचे विसर्जन केले मी तर आत्ताही तुझ्यासोबत आहे. पण ढग दाटून आले की सूर्यप्रकाश जसा लपतो. मुळात सूर्य अवकाशातच असतो. मात्र ढगांमुळे आपल्याला अंधार झाल्यासारखे वाटते आणि सूर्य नसल्याचा भास होतो. मग आपल्या मनाचही तसंच नाही का? भावना आणि अश्रूने आपलं मन भरून जातं त्यात आपणं वाचारांना स्थानचं देत नाही. म्हणून सत्य पाहू शकत नाही पण बाप्पा हा आपल्यासोबतच असतो. तो कुठेही जातं नाही हे मला जरं कोणी आधी सांगितले असते तर किंवा नंतर पटवून दिले असते तर केवळ माझ्या मनाचे सांत्वन केल्यासारखे वाटले असते. मुळात ते काही मी मनावर घेतलेही नसते पण माझ्या बाप्पांला सारं काही ठाऊक असतं तोच आपल्याला सुखी आणि आनंदी ठेवत असतो. आता पुढच्या वर्षी बाप्पा येणार म्हणून दुःख आणि आनंद या दुविधा स्थितीत मन नसणार. पुन्हा पुढल्या दाहा दिवस आपण सोबती आनंद साजरा करू असं बाप्पाला म्हणणारं तो तर नेहमीच सोबत असतो. म्हणून बाप्पा इथेच आहे फक्त त्याला मनापासून पाहण्याचा उशीर आहे. बाप्पांने दिलेली ही अनमोल शिकवण आहे ही विसरता कामा नये.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# महान क्रांतिकारक शहीद भगतसिंग

आधुनिक केसरी

**पाकिस्तान मधील पंजाब प्रांतातील बांगा गावांमध्ये 28 सप्टेंबर 1907 ला भगतसिंग नावाचा क्रांतिकारक तेजस्वी तारा जन्माला आला आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश निर्माण झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात प्रज्वलित झाली.भगतसिंगांच्या क्रांतीकारी विचारसरणीने वयाच्या 14 व्या वर्षी स्वतंत्र लढ्यात उडी घेतली.भगतसिंग यांच्या आई-वडीलांनी भगतसिंग यांचे लग्न 19 व्या वर्षी करण्याचा विचार केला. परंतु त्यांनी लग्नास नकार दिला व घर सोडून निघून गेले आणि आपल्या आई-वडिलांकरीता एक पत्र लिहिले.**

या पत्रात भगतसिंग लिहितात "मेरा जीवन एक महान उद्देश के लिये समर्पित है और वह उद्देश देश की आजादी है इसलीये मुझे तबतक चैन नही है.ना ही मेरी ऐसी कोई सांसारिक सुख की इच्छा है." यावरून स्पष्ट झाले की त्यांच्या नसानसात स्वातंत्र्याची ज्वाला धकधकत होती.8 एप्रिल 1929 ला भगतसिंग यांनी आपले क्रांतीकारी मित्र बटुकेश्वर दत्त यांच्या सोबत दिल्लीतील सेंट्रल असेम्ब्लीवर बॉंब टाकला व इंग्रजांना जबरदस्त धक्का दिला यामुळे संपूर्ण भारतात स्वातंत्र लढ्याचा आगास झाला.

आज शहिदांच्या पुण्यायीनेच देशाची 139 कोटी जनता खुला स्वास घेत आहे.अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने, प्रयत्नाने व बलीदानाने 1947 ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल 1947 ला प्रज्वलीत केली. 1928 ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले.त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन "सायमन परत जा"च्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.हि बाब सायमन कमिशनचे अधिकारी सॅंडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले. यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली. त्यामुळे जमाव पांगवण्यासाठी सॅंडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच 17 डिसेंबर 1928 ला त्यांचा अंत झाला. त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला. हे दुःख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पहावले नाही.

त्यामुळे क्रांतीकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सॅंडर्स याला ठार मारण्याचे ठरविले. लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सॅंडर्स यांच्या निवासस्थानी गेले. सॅंडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले. संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सॅंडर्सला ठार केले व तेथुन पलायन केले. यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. बरेच दिवस इंग्रजांना



हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी 23 मार्च 1931 ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली.यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही."जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोन्हिही विसरणार नाही. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून 139 कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु 95 टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते. कारण 95 टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा स्वतःच्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशविकासाची, जनतेच्या हितासाठी संपूर्ण ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही.क्रांतिकारक, शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृभुमिची रक्षाकरून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी. परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की "लोका सांगे ग्यान व स्वतः कोरडे पाषाण" यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी करोडपती झाल्याचे दिसून येतात. भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरीबीच्या खाईत जात आहे. या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल. राजकीय पुढाऱ्यांना फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा केली पाहिजे. तेंव्हाच शहिद-ए-आजम भगतसिंग यांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल. संपूर्ण देश शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे. परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो. त्यामुळे सावधान राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम शहिद भगतसिंग यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे. मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी, सरकार, प्रशासन यांनी भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे. यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व झाडांच्या पानांत, फुलात, फळात आपल्याला शहिद भगतसिंग सह संपुर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल."जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा" शहिद भगतसिंग यांना कोटी कोटी प्रणाम. जय हिंद!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# शेषनाग: देव आणि मानवाचा मित्र!

आधुनिक केसरी

**नुकतेच अनंत चतुर्दशीचे व्रत व पूजाविधी झालेली आहे, त्याच दिवशी गणरायाच्या मूर्तीचे वाजतगाजत मिरवणुकीद्वारे विसर्जनही झाले आहे. अनंत चतुर्दशी विशेष हा लेख वाचून काही चोखंदळ वाचकांनी ज्ञानवर्धक लेख असल्याची प्रतिक्रिया देत शेषनाग याविषयी माहिती विचारली होती. जेथे जावे तेथे, जेथे पहावे तेथे, जेथे ऐकावे तेथे, जेथे तेथे अगदी सर्वत्र "गणराया आले, गणराया गेले. गणेश विसर्जन झाले!" असे लोक बोलतांना आढळतात. जगन्नियंत्या-निर्मात्या विश्वपालकाचे आगमन वा गमन होईलच कसे?**

आदि-अनादी गणपती बाप्पा मोरयाचे विसर्जन होईलच कसे? कारण परमेश्वर हा नश्वर नाही. त्याला जन्म, मृत्यू, मध्यंतर अशी काहीएक मर्यादा नाही. तो येत नाही, जात नाही. तुटत नाही, फुटत नाही. तो अभंग आहे, अमर्याद आहे, अनंत आहे. एवढं मात्र खरंय, की त्यांचे प्रतिमा, फोटो, चित्र, पुतळा, मूर्ती, आदींचेच विसर्जन होऊ शकते. सोबतच आपल्याला स्वतःतील अवगुण वा दुर्गुण विसर्जित करावयाचे असतात, भगवंत, भक्त किंवा भक्ती यांचे विस्मरण करणे नव्हेच. म्हणून भक्त, भाविक, ज्ञानी, विद्वान, जाणकार यांनी गणेश विसर्जन असा शब्दप्रयोग न करता गणेशमूर्ती विसर्जन असे म्हणणेच त्यांना इष्ट ठरेल, शोभेल. असो... शेषनाग अर्थातच भगवान विष्णू एका सात फणी असलेल्या नागावर विश्राम घेत बसलेले आहेत, असे म्हटले जाते. तशीच श्रीविष्णूची प्रतिमासुद्धा काढलेली दिसते. नवनागांपैकी एक म्हणजे शेषनाग होय. याला देवांचा व मानवाचाही मित्र मानतात. श्रीविष्णूंचा अंशावतार म्हणूनही त्याच्याविषयी सांगितले जाते. कश्यप ऋषींच्या १३ बायकांपैकी कद्रु नावाच्या स्त्रीचा पुत्र शेषनाग असल्याचे भागवत पुराणात सांगितलेले आढळते. शेषनाग हा पाताळात राहत असून त्याने आपल्या मस्तकावर पृथ्वीचा भार घेतला आहे, अशी शास्त्रसंमत कल्पना करण्यात आली आहे. भगवंताचे शेषशायीरूप याच्यामुळे निर्माण झाले आहे. त्याला सहस्त्र मस्तके असल्याची कल्पना आहे. त्यामुळेच त्याने पृथ्वीला सहज तोलून अधांतरी धरले आहे. तो तिचा संपूर्ण भार सहन करत आहे. त्याच्या गळ्यामध्ये पांढरीशुभ्र रत्नमाला असून एका हातात नांगराचा फाळ व दुसऱ्या हातात कोयता आहे. असे चमत्कारिक वर्णन वाचावयास मिळते. गंगेने शेषनागाची भक्ती करून त्याच्याकडून ज्योतिष व खगोलशास्त्राचे ज्ञान मिळवले असे श्रीविष्णू पुराणात सांगितले आहे. मनात येईल त्याप्रमाणे रूप धारण करण्याची विद्या शेषनागाला ठाऊक होती. त्यामुळेच त्याचे अनेक अवतार व कला निर्माण झाल्या. वसुदेव नवजात बालकृष्णाला घेऊन गोकुळात निघाले असता धो धो पाऊस पडत होता, त्यावेळी त्या पावसापासून भगवान श्रीकृष्णाचे रक्षण करण्यासाठी शेषनागाने आपले फणाछत्र श्रीकृष्णावर धरले होते. प्रभू श्रीरामाचे बंधू लक्ष्मण, भगवान श्रीकृष्णाचे बंधू बलराम व महाभाष्यकार पतंजली हे शेषाचे अवतार समजले जातात. शेषनागास कालाचे प्रतीक मानले जाते. तो असंख्य रुपांनी सृष्टीच्या संकोच-विकासात सहभागी होत असतो. श्रीविष्णू पुराणामध्ये त्याची अशी स्तुती केलेली आहे-"त्वया धुतेयं धरणी विभर्ति चराचरं विश्वमनन्तमूर्ते| कृतादि भेदै रज कालरुपो निमेषपूर्वी जगदेतदत्सि॥" याचा अर्थ असा- हे अनंतपूर्ती शेषा, तू ज्या धरित्रीला धारण करतोस, ती पृथ्वी चराचर विश्वाला धारण करते. हे अजा, तू कृतयुगापासून निमेषापर्यंत कालाचे भाग असणाऱ्या विश्वाचे रक्षण करतोस. सर्व जगाला शेषरुपी नागाने लपटलेले आहे, अशी कल्पना आहे. काल आणि दिक या दोहोंच्या खेचाखेचीत सृष्टीच्या उत्पत्ति, स्थिती व लयाची **क्रमशः**

# मतदारांनीच काँग्रेसला दूर ठेवलं



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**ढोबळमानाने अंदाज घेतला तर गंजलेला गज पायात घुसुन जखम करून गेला तर परिणाम मलेरिया, टायफड, एवढेच नव्हे तर गँगरीनसारख्या रोगाचा सामना करावा लागतो. याउलट बांबुसारख्या वृक्षाची लागवड ज्यातुन ऑक्सीजन मिळतो आणि प्रदुषणमुक्ती होते शिवाय शेतकऱ्यांना मुबलक आर्थिक लाभ मिळतो. साठ वर्षाधिक देशाच्या राजकारणात कारभार करताना काँग्रेसची अवस्था गंज जडीत गँगरीनसारखी झाली तर मतदारांनीच या रोगापासुन मुक्ती घेताना कमळ हातात घेतले आणि 2019 पासून जनतेनं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती कारभार दिला. आम्ही सत्ता कशी चालवु शकतो?हे दाखवताना अवघ्या नऊ वर्षात जगाच्या पाठीवर आपला देश शक्तीशाली सर्वपरी म्हणून ओळखला जाऊ लागला.**

सबका साथ सबका विकास या विचाराची पेरणी अन त्यातुन निर्माण झालेले बांबु हाच अडथळा आता विरोधकांना अडचणीचे ठरताना दिसतो. ईस्ट इंडिया कंपनी इंग्रजांनी स्थापना केली. देशाला स्वातंत्र्य मिळालं पण काँग्रेसच्या रूपाने याच कंपनीने राज्य केलं. ज्याची हकालपट्टी करायला मोदी युगाचा सुर्य उगवला आणि एकदाची काँग्रेसमुक्त देश झाला. गंजलेल्या काँग्रेसच्या मांडीवर जावुन खा.संजय राऊत रूपी ठाकरे शिवसेना हिंदुत्व सोडून कितीही पायघड्या घालु लागली तरीही हे स्वार्थी राजकारण लोकांनी आता ओळखले. 2024 एकदाचं होवुन जाईल आणि मग दुध का दुध पानी का पानी झाल्यानंतर राऊतासारख्यांना ग्रहस्थाश्रम स्विकारल्याशिवाय पर्याय रहाणार नाही. परिणामी वृद्धाश्रमसुद्धा पहावा लागणार.

खा.संजय राऊत यांनी पक्षाच्या मुखपत्राद्वारे अग्रलेखीय विचार मांडताना लिहिण्याची वेळ कदाचित कोणती असावी? हे देखील संशोधन करण्यासारखं आहे. कारण जसा माध्यमासमोर बोलताना तोल जातो तसंच काही लिखाण करताना देखील हातातला पेन थरथरत असावा. कदाचित त्या पेनात शाई असेल पण डोक्यातले विचार अल्कहोल घातल्यासारखे बाहेर पडतात. मग आपण काय बोलतो? काय लिहितो? कुणावर आरोप करतो? याचे भान महाशयांना रहात नाही. काँग्रेसची अवस्था गंजलेल्या लोखंडाच्या गजासारखी यात चुक काहीच नाही. विशेष म्हणजे हे शब्द काँग्रेसवाल्याला मान्य झाले. पण बिचाऱ्या राऊतांना का लागलं? ज्याची कड त्यांनी लगेच अग्रलेख लिहुन बाहेर टाकली. देशाने पन्नास-साठ वर्षे काँग्रेसवाल्यांची सत्ता पहाताना एकाधिकारशाही, घराणेशाही आणि सरंजामशाही त्याहुन अधिक विकासापेक्षा व्यक्तीगत विकास असा कारभार अनुभवलेला आहे. शेवटी लोकांच्या मनात आलं की, मतदानाच्या रूपाने इकडचा सुर्य तिकडे उगवु शकतो. 1980 सुमारास ज्या भाजपाचे केवळ 03 खासदार त्याच पक्षाचे 303, 2019 असे होईल हे स्वप्न कदाचित भाजपाच्या लोकांना देखील पडलं नसावं. पण केवळ राष्ट्रहित, जनता हित आणि सामान्य माणसाचा विकास ही दृष्टी नेतृत्वाकडे आणि पक्षाचा अजिंडा असतो तेव्हा कधीतरी मतदारांना पटतं. जे मोदी युगातुन सिद्ध झालं. कारभार करताना कुठल्याही नेतृत्वाला आपल्या मतदारांचा विश्वास संपादन करावा लागतो. ते मागच्या नऊ वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करूनच दाखवला. ज्या पद्धतीने देशाचा झालेला सर्वांग विकास, जागतिक स्तरावर आपल्या देशाचा वाढलेला सन्मान एवढेच नव्हे तर सबका साथ, सबका विकास यातुन 800 कोटीपेक्षा अधिक योजना केंद्र सरकार सामान्य जनतेच्या कल्याणासाठी राबवु शकतं हे स्वातंत्र्यान्ांतर पहिल्यांदाच पहायला मिळालं. अमृतकाल मोदी युगाला का म्हणतात? हे यासाठीच की असा सुवर्णकाळ देशाच्या राजकारणात कधीच आलेला नव्हता. ज्यातुन समाजातील अठरापगड जातीधर्माच्या लोकांचं कल्याण भव. 2014 नेतृत्वाची संधी मिळाली. पाच वर्षात सक्षमपणे देश चालवल्यानंतर 2019 ला पुन्हा लोकांनी संधी दिली आणि मिळालेल्या संधीचा पुरेपुर वापर देशहित आणि सामान्य जनकल्याणासाठी केल्यानंतर आता 138 कोटी जनता प्रभु रामचंद्राच्या साक्षीने 2024 वाट पहाते आहे. कारण पुन्हा एकदा देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी हेच विराजमान व्हावे ही आता प्रभुची इच्छासारखी देशातील कोटी कोटी मतदारांची इच्छा होय. कदाचित घोडा मैदान जवळ येत असुन मग या राऊतांचे डोळे फाकल्याशिवाय रहाणार नाहीत. त्यांना एक दिवस सामनात अग्रलेख लिहावाच लागेल की, काँग्रेसरूपी गंजलेलं लोखंड देशातील मतदारांनी भविष्यकाळात साता समुद्रात फेकुन दिलं. कारण हे लोखंड पुन्हा या देशात राहिलं तर गँगरीनसारख्या रोगाचा सामना निश्चित करावा लागेल. गंमत याची वाटते की ज्या संजय राऊतांच्या पक्षाचा आणि नेतृत्वाचा जन्म हिंदुत्वाचा प्रखर पुरस्कार आणि विचाराचा झाला. त्यालाच मुठमाती देताना केवळ स्वार्थापोटी पक्षाचा मुळ विचार आणि तत्व बाजुला ठेवली आणि आता मातोश्रीवर देखील गंजलेल्या काँग्रेससाठी पायघड्या घालुन बिचारे संजय उभा राहिलेले दिसतात. कदाचित दिल्लीच्या दरबारात



जावुन देखील गालिच्छा टाकल्याशिवाय रहाणार नाहीत तो भाग वेगळा. राज्यात आलेलं सरकार कायदेशीर आणि राजकिय डावपेचातुन आलं पण बेकायदेशीर म्हणत म्हणत दिड वर्षाचा कालावधी झाला पण आपल्या पुलाखालुन पाणी का वाहिलं? हा विचार कधी विरोधक मंडळी करणार का? गंजलेला मेंदू आणि बुरसटलेले विचार हे मुळातच लिखाणाचा सामना करणाऱ्या अग्रलेखी संपादकाचे आणि त्याच्या मालकाचे म्हणुनच या राज्याची राजकिय संस्कृती वैचारिकदृष्ट्या बिघडुन कुणी टाकली असेल तर मातोश्रीकडं आरोप गेल्याशिवाय रहाणार नाहीत. वैफल्य व नैराश्य हे खऱ्या अर्थाने ठाकरे शिवसेनेतच पसरलेले आहे. अगोदर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गट आपल्यापासुन दुर का गेला? आपल्या नेतृत्वाच्या चुका काय? हिंदुत्व आपण समुद्रात का फेकुन दिलं? केवळ मुख्यमंत्री पदासाठी आपण भाजपसोबत पंचेवीस वर्षाचा संसार का मोडला? तुम्हाला तुमचे आमदार का सांभाळता आले नाहीत? आयुष्यभर हिंदुत्वाचा डंका बजावणारे तुमचे नेते आज पुरोगामी विचाराची तुतारी वाजवत काँग्रेसवाल्याच्या मांडीवर का जावुन बसले? सिल्वर बंगल्यावरचा नाश्ता कधी नव्हे ते तुम्हाला का आवडला? असे अनेक प्रश्न खऱ्या अर्थाने तुमच्याकडे आत्मचिंतनासाठी असताना निर्भिड संपादक म्हणुन तुम्ही कधी तरी तुमच्यावर अग्रलेख लिहिणार का? याची वाट जनतादेखील पहाते. असे संपादक खरं तर वर्तमानकाळात स्व. बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी कधीच जवळ केले नसते हे तितकंच खरं पण केवळ मातोश्रीच्या मालकाच्या समोर चमचेगिरी करणारे लिखाण करायचे आणि मी कसं विरोधकांना बदडतो? दाखवुन द्यायचं. म्हणुन एका सामान्य संपादकाचा सुरू असलेला सामना कदाचित उतरत्या कळा 2024 च्या निश्चितच लागल्या म्हणाव्या लागतील. काँग्रेसचा गंज उतरणे लांबच ठेवा याउलट भाजप पक्ष आणि नेतृत्वाला वर्तमान राजकिय स्थितीत सोन्याहुन अधिक उजळ आलेली दिसते. त्याचं कारण प्रभु रामचंद्र मंदिर, काश्मिरमधील 370 कलम, तीन तलाक पद्धत, जागतिक स्तरावर भारताचं वाढलेलं राजकिय वजन, जी-20 यशस्वी परिषद भारतात घेतल्याबद्दल आणि सर्वात म्हणजे गरीब कल्याणाच्या 800 पेक्षा अधिक योजना न्ाऊ वर्षात देशात हाती घेवुन स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांचा सन्मान पगाराच्या रूपाने करणारा पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्याला अमृतकाळ म्हणायला सामान्य लोक आता पुढे येवु लागले. राऊतांनी पंतप्रधानाला सल्ला देणं म्हणजे उंटाचा मुका घेतल्यासारखं म्हणावे लागेल. देशाच्या राजकिय पदावर विराजमान नेतृत्व यांच्यावर बोलताना आणि लिहिताना आपली लायकी काय? हे एकदा स्वतःचा चेहरा घरातल्या आरशासमोर उभा राहुन पहायला हवाच.

नऊ वर्षाच्या काळात बेरोजगारी कमी झाली. शत्रु राष्ट्रांना त्यांची जागा दाखवली. महागाई ब्रेक ठेवताना देशाची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आणुन दाखवली. भ्रष्टाचाराला पायबंद घालताना केवळ राज्यातल्या नव्हे तर देशातल्या भ्रष्टाचारी नेत्यांना देखील त्यांची जागा दाखवुन दिली. म्हणुनच खऱ्या अर्थाने 2024 चा सामना करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्या हॅटट्रिकवर देशात नव्हे तर जगात सर्वाधिक लोकप्रिय नेता म्हणुन पुढे आले. याचाच अर्थ 138 कोटी भारतीयांनी हे नेतृत्व स्विकारलं असुन राऊतांच्या पक्षाची अवस्थासुद्धा आता गंजपिछाड लोखंडासारखीच होईल आणि मग एक दिवस या संपादकाला निश्चित लिहावे लागणार की बांबु लागवड ज्यातुन शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळतो. जीवन जगण्यासाठी ऑक्सीजन मिळतो आणि पर्यावरणमुक्तीसाठी बांबु अत्यंत महत्वाचं साधन म्हणुनच अलीकडे देशभरात शेतकरी आणि युवा शक्ती बांबु लागवडीकडे मोठ्या प्रमाणावर वळलेली दिसते हे संजय राऊतांनी लक्षात घ्यावं.

# विश्वचषक क्रिकेट स्पर्धा-2023



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**5 ऑक्टोबर ते 19 नोव्हेंबर 2023 या कालावधीत क्रिकेट विश्वचषकाची 13 वी आवृत्ती भारतात आयोजित केली जात आहे. ही आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेद्वारे चालवली जाणारी एक प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धा आहे. सर्व कसोटी खेळणार्‍या देशांव्यतिरिक्त, पात्र देश यात सहभागी होत आहेत.यावेळी 46 दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत एकूण 48 सामने खेळवले जाणार आहेत. स्पर्धेत सर्व 10 संघांमध्ये राऊंड-रॉबिन लीग स्वरूपावर आधारित 45 सामने होतील. यापैकी सर्वोत्कृष्ट ४ संघ उपांत्य फेरीत खेळतील. तीन बाद फेरी, दोन उपांत्य फेरी आणि एक अंतिम सामना खेळवला जाईल. वर्ल्ड कपच्या आतापर्यंत बारा आवृत्त्या झाल्या आहेत. या काळातले अनेक रंजक किस्से आहेत....**

विश्वचषक स्पर्धेचा प्रवास- पहिली क्रिकेट विश्वचषक स्पर्धा 1975 मध्ये इंग्लंडमध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर, दर चार वर्षांनी ( 1992 मध्ये प्रत्येक पाच वर्षांनी आणि 1999 मध्ये तीन वर्षांनी वगळता) त्याचे आयोजन केले जाते. इंग्लंडने 1975, 1979, 1983, 1999 आणि 2019 मध्ये सर्वाधिक पाच वेळा भारत आणि पाकिस्तान 1987, 1996 आणि 2011 मध्ये तीन वेळा, 1996 मध्ये श्रीलंकेसह. 1992 आणि 2015 मध्ये दोनदा ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंड. दक्षिण आफ्रिका 2003 आणि वेस्ट इंडीज 2007 ने प्रत्येकी एकदा यजमानपद भूषवले आहे. ऑस्ट्रेलियाकडे सर्वाधिक पाच जेतेपदे आहेत. भारताने 1983 मध्ये 60 षटकांचे आणि 2011 मध्ये 50 षटकांचे - दोन वेगवेगळ्या विश्व षटकांचे विजेतपद पटकावले आहे. विश्वचषकात सचिनच्या नावावर सर्वाधिक २२७८ धावा आहेत, तर २३७ धावांची वैयक्तिक धावसंख्या न्यूझीलंडच्या मार्टिन गप्टिलच्या नावावर आहे. ख्रिस गेल आणि मार्लन सॅम्युअलच्या नावावर 372 धावांची सर्वात मोठी भागीदारी झिम्बाब्वेविरुद्ध आहे. सर्वाधिक 71 विकेट्स घेण्याचा विक्रम ग्लेन मॅकग्राच्या नावावर आहे. भारतीय गोलंदाज चेतन शर्माच्या नावावर विश्वचषकातील पहिली हॅटट्रिक घेण्याचा विक्रम आहे, जी त्याने 1987 मध्ये साधली होती. 1987 मध्ये पहिल्यांदा विश्वचषक इंग्लंडच्या बाहेर आयोजित करण्यात आला होता, ज्याचे आयोजन भारत आणि पाकिस्तानने केले होते. या विश्वचषकात प्रथमच एका सामन्यातील षटकांची कमाल मर्यादा ६० वरून ५० करण्यात आली. 1992 मध्ये पहिल्यांदा विश्वचषकात रंगीबेरंगी कपडे, पांढरा चेंडू आणि दिवस-रात्र सामने आयोजित करण्यात आले होते. 1975 आणि 1979 मध्ये वेस्ट इंडिजच्या क्लाइव्ह लॉईड आणि 2003 आणि 2007 मध्ये ऑस्ट्रेलियाच्या रिकी पॉन्टिंग यांच्या नेतृत्वाखाली दोनदा विश्वविजेते बनण्याचा विक्रम आहे. आजपर्यंतचे विश्वविजेता संघ- आतापर्यंत बारा विश्वचषकांचे आयोजन करण्यात आले आहे, जे पाच देशांनी जिंकले आहेत - ऑस्ट्रेलियाने 1987, 1999, 2003, 2007 आणि 2015 अशी पाच वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. वेस्ट इंडीज 1975 आणि 1979 आणि भारत 1983 आणि 2011 प्रत्येकी दोनदा हा चषक आपल्या नावावर केला आहे. आणि पाकिस्तान 1992, श्रीलंका 1996 आणि इंग्लंड 2019 प्रत्येकी एकदा हा चषक जिंकण्यात यशस्वी झाले आहेत. क्रिकेटविश्वावर प्रदीर्घ काळ अधिराज्य गाजवणारे दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि बांगलादेश अजूनही या विश्वविजेतेपदापासून वंचित आहेत. विश्वचषकातील सर्वात संथ खेळी- विश्वचषकातील सर्वात संथ खेळी खेळण्याचा अनोखा विक्रम आजही सुनील गावस्कर यांच्या नावावर आहे. भारताचा सामना 7 जून 1975 रोजी इंग्लंडशी झाला होता.इंग्लंडने 60 षटकांत 4 गडी गमावून 334 धावा केल्या. गावस्कर झटपट धावा करतील, अशी सर्वांनाच अपेक्षा होती. पण गावस्कर सलामीला आल्यानंतर ६० षटकांत १७४ चेंडू खेळून एका चौकारासह ३६ धावाच करू शकले. अखेर ते नाबाद राहून पॅव्हेलियनमध्ये परतले.गावस्करची ही खेळी आजही विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात संथ खेळी म्हणून ओळखली जाते. याच गावसकर यांनी 1987 मध्ये न्यूझीलंडविरुद्ध नागपुरात 85 चेंडूत शतक झळकावले होते, जे त्यावेळचे दुसरे जलद शतक होते. झेलची कमाल, जिंकले आणि पराभूतही झाले- 25 जून 1983 चा काळ होता. इंग्लंडमध्ये भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तिसऱ्या विश्वचषकाचा अंतिम सामना खेळला जात होता. भारतीय संघ केवळ 183 धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला होता. भारतीय क्रिकेट चाहत्यांना वेस्ट इंडिजची दमदार फलंदाजी पाहता भारताचा पराभव निश्चित वाटत होता. वेगवान फलंदाज व्हिव्हियन रिचर्ड्सने सलग सात चौकार मारून वेस्ट इंडिजच्या तिसऱ्यांदा विजयाचा मार्ग खुला केला. पण रिचर्ड्सने मदनलालचा एक चेंडू जोरात मारला तेव्हा भारतीय कर्णधार कपिल देवने विरुद्ध दिशेला धावत जात एक अशक्य वाटणारा झेल घेत रिचर्ड्सला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. भारताच्या विश्वविजेतेपदासाठी हा झेल महत्त्वाचा ठरला. कारण त्यानंतर संपूर्ण वेस्ट इंडिज संघ 143 धावांवर बाद झाला. कपिलच्या या झेलमुळे भारत पहिल्यांदाच विश्वविजेता बनला.

आत्मसन्मान दुखावल्याने विश्वविजेता बनला- १९९६ ची विश्वचषक स्पर्धा भारत-पाकिस्तान-श्रीलंका यांनी संयुक्तपणे आयोजित केली होती. त्यावेळी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून श्रीलंकेतील परिस्थिती सामान्य नव्हती. या कारणास्तव, ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिजच्या संघांनी श्रीलंकेत नियोजित केलेले त्यांचे साखळी सामने खेळण्यास नकार दिला. यामुळे श्रीलंकन क्रिकेटपटू आणि तिथल्या क्रीडाप्रेमींच्या स्वाभिमानाला खूप मोठा धक्का बसला.

आत्मसन्मान दुखावल्याचा बदला घेण्यासाठी श्रीलंकेच्या संघाने विश्वचषक जिंकून उत्तर देण्याचे ठरवले.या हेतूने त्यांनी आपली खेळण्याची शैलीच बदलली. तळातील फलंदाज असलेल्या सनथ जयसूर्या आणि यष्टीरक्षक कलुवितरण यांचा सलामीवीरात समावेश करण्यात आला आणि त्यांना आक्रमक फलंदाजी करण्याचे आदेश देण्यात आले.याच रणनीतीच्या जोरावर खेळत श्रीलंकेचा संघ अंतिम फेरीत पोहोचला. जेतेपदाच्या लढतीत त्यांचा सामना त्याच ऑस्ट्रेलियन संघाशी झाला ज्याने श्रीलंकेत जाऊन न खेळल्याने लंकेच्या खेळाडूंचा स्वाभिमान दुखावला होता. श्रीलंकेच्या खेळाडूंनी विजेतपदाच्या लढाईत पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करत बलाढ्य ऑस्ट्रेलियन संघाचा 7 विकेट्स राखून पराभव करत विश्वविजेता होण्याचा बहुमान पटकावला.

# परशुराम आर्थिक विकास महामंडळाविषयी परशुराम सेवा संघाची भूमिका

आधुनिक केसरी

ब्राह्मण समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ असावे ही भूमिका परशुराम सेवा संघाच्या स्थापना बैठकीपासूनच म्हणजे 2018 पासून कायम आहे त्यासाठी परशुराम सेवा संघाने नेहमी आग्रही भूमिका घेतलेली आहे. 22 जानेवारी 2019 मुंबई व 3 ऑगस्ट 2019 नागपूर येथील आंदोलने व तत्कालीन सत्ताधारी त्यानंतर आलेले मविआ सरकार व 2022 साली तयार झालेले महायुती सरकार यांना सातत्याने निवेदने, भेटी, प्रत्यक्ष पाठपुरावा परशुराम सेवा संघाच्या वतीने करण्यात आला आहे. 19 ऑगस्ट 2019 रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने अकॅडमी ऑफ महाराष्ट्र रिसर्च अँलिफ्टमेन्ट अँड ट्रेनिंग 'अमृत' हि संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकासाठी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. अमृत संस्थेची मूळ व्याख्या हि संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटक ज्यांना इतर कोणतीही संस्था,महामंडळ, दर्जा असा कोणताही लाभ होत नाही असे लोक यांच्याकरिता काम करेल अशी होती परंतु पुढे आलेल्या माविआ सरकारने हि व्याख्या बदलली त्यामुळे समाजात संभ्रम निर्माण झालेला आहे त्यामुळे दिनांक 13 सप्टेंबर 2023 रोजी सरकारने शासन निर्णय करून पूर्वीची मूळ व्याख्या कायम केली आहे. अमृत संस्थेचे कामकाज व्यवस्थित सुरु झाले असून त्याद्वारे तरुण/तरुणी, उद्योजकता विकास शिक्षण इत्यादी विषयात उत्तम योजना सुरु करण्यात आल्या आहेत त्याला उत्तम निधी देखील दिला गेला आहे सदर योजना आपण WWW.MAHAAMRUT.ORG.IN वर पाहू शकता. स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ असावे हि भावना समाजघटकांत आजही आहे व महामंडळ होण्यासाठी परशुराम सेवा संघाचं संपूर्ण पाठिंबा आहे पण जोपर्यंत महामंडळ होत नाही तोवर अमृत संस्थेच्या योजनांचा आपण लाभ घ्यावा असे आवाहन मी आपणास करत आहे.

विश्वजीत देशपांडे
प्रदेशाध्यक्ष, परशुराम सेवा संघ महाराष्ट्र

# गणपतीसमोर महिलांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** ॐ नमस्ते गणपतये.. त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि.. त्वमेव केवलं कर्तासि... असे अथर्वशीर्ष पठणाचे सामूहिक स्वर, महिलांनी केलेला शंखनाद आणि मोरया मोरया च्या जयघोषाने मंत्रमुग्ध झालेल्या वातावरणात महिलांनी सामुदायिकरित्या अथर्वशीर्षाचे पठण केले. शहरातील शिवाजी नगर येथील अष्टविनायक गणपतीसमोर झालेल्या अथर्वशीर्षाचे पठण कार्यक्रमाने मंगळवार 26 सप्टेंबर रोजी मंत्रोच्चाराने वातावरण मंगलमय झाले होते. गणपती बाप्पाच्या पवित्र मंगलमय महोत्सवा निमित्त विश्वाच्या कल्याणात शेतकरी राजावर आलेले अस्मानी संकट दूर होऊन राजाची कृपा व्हावी व सुख शांती धन धान्य समृद्धी सर्वांना प्राप्त व्हावी गणपती बाप्पाच्या कृपेने सर्वांच्या भरभराटीसाठी शहरातील नृसिंह प्रतिष्ठान च्या वतीने अध्यक्षा प्रेक्षा भांबळे यांच्याकडून सामुदायिक गणपती अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी चार ते पाच या वेळेत शहरातील शिवाजीनगर येथील अष्टविनायक गणपती मंदिर येथे मोठ्या प्रमाणावर शहरातील महिलांनी गणपती अथर्वशीर्ष पठण केले यावेळी गणपतीची आरती घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गिते, के शी घुगे सर, ससे साहेब,आबा बुधवंत, पोले सर, आघाव सर, मनोज थिटे,बाळासाहेब भांबळे, बाळासाहेब तळेकर, घुगे सर, रामचंद्र (पिंटु) डोंबे, दिपक डोंबे, संजय घुले, महेश घुगे, पिंटु गंजे, काना दिक्षित,महेश राठोड, मनिषा ताई केंद्रे, महानंदा बाळासाहेब भांबळे, आशाताई उबाळे व छत्रपती शिवाजी नगर मित्र मंडळ तसेच शहरातील हुतात्मा स्मारक महिला भजनी मंडळ व आनंद नगर महिला भजनी मंडळांनी आपला सहभाग नोंदविला होता.





# कोंगारा येथील कृषिकन्यांनी पिंपरी येथील शेतकऱ्यांना बीज प्रक्रियेचे दाखवले प्रात्यक्षिक

आधुनिक केसरी न्यूज

**पांढरकवडा :** पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित कृषी महाविद्यालय, कोंगारा येथील सातव्या सत्राचे कृषिकन्यां काजल बोदे, शामली शेडमाके, संजना बुच्चे, प्रतीक्षा चवले यांचे ग्रामीण कृषी कार्यानुभव या कार्यक्रमा अंतरगत बीज प्रक्रिया करण्याच्या पद्धती आणि फायदे काय आहे याबद्दल पिंपरीच्या शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक दिले. कोणतेही पीक लावताना आपण जसे जमिनीची पूर्व मशागत करतो तसेच पिकामध्ये येणाऱ्या कीडीचे व रोगाचे प्रतिबंधात्मक नियोजन करणे फायदेशीर ठरते. यासाठी बियाण्यांची बीज प्रक्रिया करणे गरजेचे आहे. पीक संरक्षणामध्ये जेवढे महत्व फवारणी मधून कीड रोग नियंत्रसाठी दिले जाते तेवढे महत्व बीजप्रक्रीयेस दिले जात नाही. बरेच शेतकरी बीज प्रक्रिया करीत नाहीत, बीज प्रक्रिया केल्यामुळे खूप फायदे होतात. असे कृषिकन्यांनी शेतकऱ्यांना सांगितले जमिनीतून व बियाण्याद्वारे पसरणाऱ्या रोगांचा उदा. मर रोग आणि मूळ कूज इ. प्रादुर्भाव टाळता येतो तसेच बियाण्याची उगवण क्षमता वाढते बिजप्रक्रियेसाठी कमी खर्च येतो, त्यामुळे ही कीड/रोग नियंत्रणाची किफायतशीर पध्दत आहे.

# आ. मेघना बोर्डीकरांच्या हस्ते सोस येथे दलितवस्ती सुधार योजनेच्या कामाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील सोस येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रस्त्याच्या कामाचे उद्घाटन आ मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते दिनांक 27 सप्टेंबर रोजी करण्यात आले.
तालुक्यातील सोस येथील दलित वस्ती मध्ये मागील काही दिवसांपासून रस्त्याची दुर्दशा झाली होती म्हणून सरपंच माणिक शिंदे यांनी पाठपुरावा करून दलीतवस्ती सुधार योजने अंतर्गत रस्ता कामासाठी 10 लाख रुपये मंजूर करून घेतले होते दरम्यान आमदार मेघना बोर्डीकर यांनी भाजपा संवाद दौऱ्या निमित्त गावकऱ्यांशी संवाद साधला यावेळी रस्ता कामाचे उद्घाटन आ मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी सरपंच माणिक शिंदे,उपसरपंच राजाभाऊ शिंदे,भाजपा तालुका अध्यक्ष अँड विनोद राठोड,पोलीस पाटील सोमेश्वर उदावंत,सुधाकर गंडले,संतोष शिंदे,ज्ञानोबा शिंदे,विष्णू मगर यांच्यासह गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



# पावसाच्या तडाख्यात महावितरणला ४५ लाखांचा फटका; अडीचशे मीटरमध्ये पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूर जिल्ह्याला शुक्रवारी रात्री पावसाने झोडपल्याने अंबाझरी तलाव 'ओव्हरफ्लो' झाला. त्यामुळे शहरातील अनेक नाल्यांना पूर आल्याने अंबाझरी, डागा ले-आऊट, शंकरनगरसह अनेक भागात पूर व पावसाचे पाणी तुंबले. परिणामी, महावितरणचे जिल्ह्यात ४५ लाखांचे नुकसान झाले. त्यापैकी सर्वाधिक ८० टक्के हानी शहरी भागात झाली आहे. नागपूर जिल्ह्यात पावसाच्या तडाख्यात महावितरणचे उच्च दाबाच्या वाहिनीवरील ७१ आणि लघुदाबाच्या वाहिनीचे २५६ वीज खांब कोलमडून पडले. सोबत उपरी वीज वाहिनीचे उच्चदाबाच्या ०.७ किलोमीटर तर लघुदाबाच्या ५.४५ किलोमीटर लांबीच्या वाहिन्या खराब झाल्या. सोबत शहरातील १९ तर ग्रामीणचे २३ वितरण रोहित्र बिघडले. सोबत उच्च दाबाचे ७३ आणि लघुदाबाच्या १७४ वीज मीटरमध्ये पाणी शिरल्याने तेही बिघडले. पावसाच्या तडाख्यात शहरातील ३ आणि ग्रामीणचे ३ अशा एकूण ६ वितरण पेट्या खराब झाल्या. तर भूमिगत वाहिन्यांबाबत शहरातील उच्च दाबाच्या ०.२४ किलोमीटर तर लघुदाबाच्या १ किलोमीटर लांबीच्या वाहिन्या खराब झाल्या. त्यामुळे शहरी भागातील ३६ लाख आणि ग्रामीण भागातील ९ लाख असा एकूण महावितरणला ४५ लाख रुपयांचा फटका बसला. महावितरणचे सर्वाधिक नुकसान हे पुराचा सर्वाधिक फटका बसलेल्या आणि संपूर्ण तळमजला पाण्यात असलेल्या अंबाझरी, डागा ले-आऊट, कार्पोरेशन कॉलनी, शंकरनगर आणि शेजारच्या परिसरांना बसला.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# गणेश मंडळांना भेटी देऊन हंसराज अहीर यांनी केली सर्वांच्या सुखसमृद्धीची कामना

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरातील अनेक वार्डातील सार्वजनिक गणेश मंडळांना दि. 26 सप्टेंबर 2023 रोजी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी भेट देवून श्रीगणेशाचे दर्शन घेत आशीर्वाद घेतला. यावेळी त्यांनी सर्वांच्या सुख, समृध्दी व निरामय स्वास्थ्यासाठी प्रार्थना केली.

हंसराज अहीर यांनी भानापेठ, पठाणपूरा, जोडदेवूळ, हिवरपूरी, गोंडराजाचा वाडा, गणपती मंदीर, विठ्ठल व्यायामशाळा, चंद्रपूरचा राजा या गणेश मंडळांना भाजप पदाधिकाऱ्यांसह भेट देवून मंगलमुर्ती गणरायांचे दर्शन घेतले व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी वार्तालाप केला. या बरोबरच तुकूम, बंगालीकॅप, इंदिरा नगर, बाबूपेठ व लालपेठ वार्डातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपास भेटी देवून गणरायांचा आशिर्वाद घेत मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी विविध विषयांवर चर्चा केली. विसर्जन सोहळ्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यास सर्व मंडळांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

# युवकांनी स्वतः चे उद्योग उभारून स्वावलंबी व्हावे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आजच्या युवकांनी नौकारीच्या मागे लागून वेळ घालविण्यापेक्षा स्वतःचा छोटा-मोठा उद्योग उभारून आपले करिअर बनवावे, असे आवाहन वैजापूर-गंगापूरचे आमदार प्रा.रमेश पा,बोरनारे यांनी बुधवार रोजी ठक्कर बाजार येथे आरुष इलेक्ट्रिकलस या फर्म चे उदघाटन करतांना केले. वैजापूर एम, आय,डी,सी, लवकरच सुरू करण्यासाठी ही सर्वंकष प्रयत्न करणार असल्याचे आ.बोरनारे म्हणाले. अक्षय रातीलाल गायकवाड या सुशिक्षित युवकाने हे दुकान सुरू केले. तरुण वर्गाने नौकरीची वाट पाहण्यापेक्षा स्वतः चा उद्योग उभारला तर समाजहित, राष्ट्रहित साधल्या जाईल असे ही ते पुढे म्हणाले. कार्यक्रम सूत्र संचलन सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. या प्रसंगी काशिनाथ शेठ गायकवाड, संजय बोरनारे, रणजित चौहान, सरपंच दौलत गायकवाड, संदीप बोर्डे, शंकर पहेलवान, जगन गायकवाड यांची उपस्थिती होती.



# जंगलातांडा येथे बाजरी पिकाची शेतीशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी विभागाच्या वतीने मौजे जंगला तांडा येथे तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदिया व मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले व कृषी पर्यवेक्षक समाधान चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती चव्हाण एस एस कृषि सहाय्यक यांनी बाजरी पिकाची शेतीशाळा घेऊन किड व रोग नियंत्रण औषध फवारणी करताना काय काळजी घ्यावी तसेच आपत्कालीन परिस्थितीत बाजरी कमी खर्चात येणारे पीक असून कमी कालावधीत भरघोस उत्पन देणारे पीक असून तसेच पौष्टिक तृणधान्य विषयी महत्त्व सांगितले.यावेळी सरपंच व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# जेजुरीगड कामाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी, पहिल्या टप्प्यातील कामांना मान्यता

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** कुलस्वामी जेजुरी मल्हार मार्तंड मंदिराच्या मंदिरगड गाभारा परिसराची पाहाणी नुकतीच पुणे जिल्हाधिकारी डॉ राजेंद्र देशमुख पुरंदर प्रांत मिनाज मुल्ला जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आणि पुरातत्व विभाग संचालक डॉ विलास वाहाणे यांनी सरकारी विकास आरखड्याची पाहाणी केली मंदिरं गाभारा कामकाज अतिशय जलद गतीने सुरु असून येतील मुलस्वरूपाल महत्व देत त्यांनी काही सूचनाही पुरातत्व विभागाला दिल्या आहेत तर ओवऱ्या पायरी मार्ग दीपमाळा रंगमहाल याची ही पाहाणी करीत त्यांनी समाधान व्यक्त केले आहें चार कामांच्या निविदा प्रक्रियाही सुरु झाल्याची माहिती डॉ. देशमुख यांनी दिली.

पहिल्या टप्प्यातील एकशे नऊ कोटीच्या मंजुरी विकास आराखडा कामना गती मिळाली असून उर्वरित कामे गतिमान करण्याचा प्रयत्न पुरातत्व विभाग कार्यालयाकडून केला जात आहें मंदिरं कामकाज भेटी प्रसंगी जेजुरी श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने डॉ. राजेंद्र देशमुख तसेच डॉ. वाहणे आणि प्रांत अधिकारी मुल्ला यांनाचा खडोबा प्रतिम देऊन ॲड. पांडुरंग थोरवे यांनी सन्मानित केले. या प्रसंगी देवसंस्थान अध्यक्ष पोपट खोमणे, विश्वस्त मंगेश घोणे, ॲड विश्वास पानसे, ट्रस्टी अभिजित देवकाते खान्देकरी मानकरी मंडळ अध्यक्ष जालिंदर खोमणे कृष्णा लाखे जेजुरी गड व्यवस्थापक राजेंद्र जगताप मंदिरं संस्कृती उपासक गुरवपूजारी वीर कोंळी घडशी आदी मानकरी उपस्तिथ होते.

# बावनकुळे साहेब तुमच्या कार्यालयात पाच वर्षे चहा लागतो त्याचे पैसे पत्रकार देणार

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** भारत लुटून खाणाऱ्या पार्टीचे महाराष्ट्रराज्य प्रदेश अध्यक्ष बावनकुळे साहेब ईडीच्या धाडीची भीती दाखवून आपला पक्ष महाराष्ट्र राज्यात सत्तेवर आसुन आपण त्या पक्षाचे अध्यक्ष आहेत ईडीच्या धाडी टाकून जसं महाराष्ट्र राज्यात सत्ता टिकून ठेवली तसे पत्रकार बांधवाना चहा पाजून गप्प करने हेवढे सोपे नाही आपला जीव



किती तुम्ही बोलतात किती याची किंव येते. बाबनकुळे साहेब आपल्याला जेवढा निवडणुकीत मतदार संघात लागन तेवढा व निवडणूकीत पराभव झाल्यानंतर तुमच्या कार्यालयात लागल तेवढा चहा सर्व पत्रकार बांधव करतील यांची काळजी करू नका. यापुढे सर्व सामान्य नागरिक व पत्रकार बांधवानावर बोलताना आपला जेवढा जीव आहे तेवढंच बोला नाहीतर जनता तुम्हाला रस्त्यावर फरुन सुद्धा देणार नाही. तुमचा पक्ष कार्यालयात जेवढा दररोजचा चहा लागेल त्याचे पैसे राज्यातील पत्रकार बांधव तुम्हाला देणार असे आझाद पत्रकार गणेश शेवाळे यांनी सांगितले आहे.



# सात दिवसीय योग शिबिराची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** गणपती उत्सवाच्या निमित्ताने समर्थ नगर हनुमान मंदिर नांदेड येथे चालत असलेल्या योग शिबिराची आज गुरुवारी सांगता झाली. आदरणीय सितारामजी सोनटक्के योग शिक्षकाद्वारे योगाचे मार्गदर्शन झाले. श्रेयस मार्कंडेय यांनी योग क्षेत्रातील करियर या विषयावर मार्गदर्शन केले. योग करून स्वतःला निरोगी ठेवता येते त्यासोबतच आपली उपजीविकेचे माध्यम पण योग होऊ शकते असे सांगितले. अनिल अमृतवार यांनी सर्वसाधारकांना गुळवेल वनस्पती काढा दिला. या शिबिरात सर्वश्री सोपानराव मारकवाड, रघुनाथराव माचेवाड, गोपाल कासट, नामदेवराव मोहिते, मैनाबाई मोहिते, अरुण गोडसे, राणी दळवी, रंजनाताई सोनटक्के, शिवाजीराव शिंदे हळदेकर, शिवाजी पेन्सलवार, साईनाथ कांबळे, महारुद्र माळगे, आदी सादक उपस्थित होते असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.

# फर्दापूर परिसरात चोरी होऊ नये म्हणून काळजी घ्यावी; स.पो.नि. भरत मोरे

आधुनिक केसरी न्यूज

**फर्दापूर :** सावळदबारा परिसरात नागरिकांच्या घरी चोरी



होऊ नये, यासाठी फर्दापूर पोलिस ठाणे च्या वतीने विशेष काळजी घेण्याबाबतचे पत्रक जारी करण्यात आले आहे. हे पत्रक पोलिस निरिक्षक भरत मोरे यांच्या सहीनिशी प्रसारित करण्यात आले आहे, या पत्रकात नमूद आहे, की बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना घराकडे लक्ष ठेवण्याची विनंती करावी, मौल्यवान दागिणे हे बँकेच्या लॉकरमध्ये ठेवावेत, रोख रक्कम जास्त प्रमाणात बाळगू नये, फोन पे गुगल पे चा वापर करावा, बाहेर जाताना घराच्या मागील व पुढील बाजूसमोर लाईट लावावा, घराच्या दरवाज्याच्या बाहेर पडदा नये लावून कुलूप लावावे, जेणेकरुन कुलूप दिसणार नाही. चप्पल, बुट हैं दरवाजासमोरच ठेवावेत, अशाप्रकारे विशेष काळजी घेण्याचे आवाहन पत्रकाद्वारे करण्यात आले आहे. यासोबतच आपल्या गल्लीत किंवा गावामध्ये कोणी अनोळखी व्यक्ती आल्यास त्यावर पाळत ठेवावी. पोलिसांना त्वरीत माहिती द्यावी. एटीएम कार्ड वापरताना कोणत्याही अनोळख्या व्यक्तीकडे देऊ नये, आप ले दुकान अथवा राहते घरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, मोबाईल ॲपद्वारा कोणत्याही जातीधर्माच्या, दागिने पॉलिश करुन देतो, असे सांगणाऱ्यावर विश्वास ठेवू नये, असे आढळल्यास पोलिसांशी त्वरित संपर्क साधावा, संशय आल्यास किंवा चोरी झाल्यास फर्दापूर पोलिस स्टेशनशी संपर्क साधावा.



# धानोरा बु. येथे शांततेत विसर्जन

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** तालुक्यातील मौ.धानोरा बु.येथील कोळी राजा गणेश मंडळाचा भव्य मिरवणूक काढून गावातील मेन रोड वरून फिरून अगदी शांततेत विसर्जन पार पाडत गणरायास निरोप दिला आहे. तालुक्यात असे उमरी शहरासह तालुक्यात एकूण १४४ ठिकाणी गणेश एकुण १४४ गणेश मूर्तीची प्रतिस्थापना करण्यात आली होती. त्यात उमरी तालुक्यात 'एक गाव,एक गणपती' ही संकल्पना २०गावात राबविण्यात आली आहे, शहरासह व तालुक्यात सर्वत्र ढोल ताशांच्या गजरात वाजत, गाजत,नाचत 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात अनेक ठिकाणी तर तालुक्यात १२० यांनी चोख बंदोबस्त त्यात पाच दिवसांच्या दोन गणपती तर सहा दिवसांचा एक,सात दिवसांचे अकरा,नऊ दिवसांचे १४,तर दहा दिवसांचे २३ तर उर्वरीत अकरा दिवसांचे गणपतींचा समावेश होता.

कायद्याचे पालन करुन उत्साहात गणेश विसर्जन मिरवणूक थाटामाटात संपन्न करण्यात आली आहे. यावेळी, मंडळाचे अध्यक्ष शाहरुख शेख उपाध्यक्ष ऋषीकेश बारोळे, ज्ञानेश्वर मामडे,साई जगताप, शिवप्रसाद माणिके, शुभम मोळके, शिवा बारोळे, साई गलांडे, ऋषिकेश मामडे, उमेश डोकळे,राम मामडे, गणेश गलांडे, साईनाथ बळवंते, श्रीकांत माणिके, शुभम मामडे, श्रीकांत बळवंते, मंगेश दसरे, अत्री सोगे,बबन बलवंते यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. पोलीस बिट जमादार श्रीराम सवई त्याचे सहकारी कर्मचारीवर्ग यांनी चांगला बंदोबस्त देऊन सहकार्य केले.कोळी राजा गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने त्याचे आभार मानले.

# गणेश मंडळाने राबविला स्पर्धा परीक्षा पेपरचा उपक्रम

## मांगवाडी येथील स्तुत्य कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** नजीकच्या मांगवाडी येथील जय बजरंग गणेश मंडळाने गणेश उत्सवानिमित्त स्पर्धा परीक्षा पेपर सोडविण्याचा एक आगळा वेगळा उपक्रम राबविला आहे. त्यांच्या या स्तुत्य कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गावातली अभ्यासू, होतकरू आणि विशेष म्हणजे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सरावात भर पडावी, या स्तुत्य हेतूने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंडळाने दिली आहे.तद्वतच, भविष्यात स्पर्धा परीक्षा देण्यासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा कशी घेतल्या जाते याचे ज्ञान व्हावे, या साठी सुद्धा या उपक्रमाचा लाभ होणार आहे. सदर स्पर्धा दोन गटात घेण्यात आली आहे. वर्ग १ ते ५ आणि वर्ग ८ ते १० या दोन गटात ऐकून १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून जय बजरंग गणेश मंडळाच्या उपक्रमाचा लाभ घेतला असल्याची माहिती स्पर्धेचे आयोजक ऋषिकेश पाटील जाधव यांनी दिली आहे. स्पर्धेसाठीचे सर्व मार्गदर्शन श्री अमोल वानखेडे सर यांनी केले असून, शिक्षक सर्वश्री गोपाल मोरे, दत्ता घाटे, दत्ता खेलबाडे, बद्री जाधव आदींनी मोलाचे सहकार्य केले आहे. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विशेष बक्षीस शिक्षक वृंद देणार असल्याची माहिती मंडळाने दिली आहे.



# घारापुरी येथे स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** केंद्र व राज्य शासनातर्फे स्वच्छता विषयक विविध अभियान, उपक्रम सुरु असून "स्वच्छता हिच सेवा" अंतर्गत घारापुरी येथील समुद्र किनारा व परिसरात दिनांक २७/०९/२०२३ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यावेळी भारतपर्यटन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभाग आणि ग्रामपंचायत घारापुरी यांचे संयुक्त विद्यमाने सदरचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी भारतपर्यटन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभाग आणि घारापुरी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. स्वच्छता अभियान राबविल्याने घारापुरी परिसर स्वच्छ व सुदंर झाले आहे.





# खंडोबारायाच्या चरणी नारळ फोडून शेतकरी विकास पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणूक होऊ घातली असून 07 ऑक्टोबर रोजी लोहा बाजार समितीचे मतदान होणार आहे, शेतकरी विकास पॅनलचे अधिकृत उमेदवार सेवा सहकारी सोसायटी सर्वसाधारण मतदारसंघातील विक्रांत श्यामसुंदर शिंदे,चंद्रसन ईश्वरराव पाटील, स्वप्नील मोहनराव पाटील उमरेकर, भास्करराव चंद्रकांत ढगे, दत्ता रेश्माजी दिघे ,साहेबराव रावसाहेब काळे, धोंडीबा रघुनाथ पवार सेवा सहकारी महिला राखीव मतदारसंघ पुनम विश्वंभर क्षीरसागर , सयंत्राबाई रत्नाकर सर्जे इतर मागासवर्गीय सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघातून बसवेश्वर वैजनाथ धोंडे, विमुक्त जाती सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघातून केशव सिताराम तिडके ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदारसंघातून वाकडे लक्ष्मीबाई उत्तमराव, आणासाहेब दत्तात्रेय पवार , ग्रा. आर्थिक दृष्ट्या मतदारसंघातून केंद्र केरबा रामराव,मधुकर महादू डाकोरे,व्यापारी मतदारसंघातून बाबाराव धोंडीबा शेटे , अंगद व्यंकटी मोरे व हमाल मतदारसंघातून कंधारे भाऊराव मोतीराम यांच्या शेतकरी विकास पॅनलच्या प्रचारार्थ आज दिनांक 27 सप्टेंबर बुधवारी शेकाप,काँग्रेस,मण्याड फाउंडेशन,शिवा संघटना, बी.आर.एस.सर्व पक्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत श्री.क्षेत्र खंडोबाच्या मंदिरामध्ये सर्व आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने श्री क्षेत्र खंडोबारायांचे चरणी नारळ फोडून शेतकरी विकास पॅनलच्या सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा नारळ फोडण्यात आला यावेळी शेकाप, काँग्रेस,शिवा संघटना,मण्याड फाउंडेशन,शिवसेना,बी.आर.एस युतीच्या वतीने लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे समितीच्या प्रचाराची नारळ फोडण्यात आले, यावेळी शेकाप महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई श्यामसुंदर शिंदे,माजी आमदार रोहिदास चव्हाण,मण्याड फाऊंडेशनचे अध्यक्ष एकनाथ पवार,आमदार मोहन अण्णा हंबर्डे यांचे चिरंजीव तथा युवा नेते राहुल हंबर्डे, मा.जि.प.सदस्य चंद्रसेन पाटील,जिल्हा नियोजन समिती सदस्य एकनाथ मोरे,जिल्हा काँग्रेस सरचिटणीस संजय भोसीकर, मा.जि.प.सदस्य विजयराव धोंडगे,मा.जि.प.सदस्य रंगनाथ भुजबळ, मा.जि.प.सदस्य श्रीनिवास मोरे,खरेदी विक्री संघ उपसभापती श्याम अण्णा पवार,तालुका काँग्रेस कमिटी लोहा तालुकाध्यक्ष शरद पवार,तालुका काँग्रेस कमिटी कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे,माजी उपनगराध्यक्ष सोनू संगेवार,मा.सभापती कंधार ज्ञानेश्वर चोंडे,शेकाप जिल्हाध्यक्ष बालाजी इसादकर सह आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते, सोसायटीचे चेअरमन,सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, हमाल मापाडी बांधव व मतदार बहुसंख्येने उपस्थित होते.

# वाढदिवसानिमित्त केले वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** कुटुंबातील सदस्यांच्या वाढदिवसाची आठवण म्हणून पाच वर्षापासून जळगाव येथे हवालदार राजीव जाधव हे वृक्षारोपण करीत आहेत. गेल्या तीन वर्षापासून रोपे विजेंद्र फाउंडेशनतर्फे व वनविभागामार्फत मिळवून वृक्षारोपण करीत असतात हवालदार राजीव जाधव हे हवालदार असले तरी त्यांना शेतीची विशेष आवड आहे.

निसर्गावर विशेष प्रेम असल्याने तसेच मानवासाठी झाडांचे मोठे योगदान असल्यामुळे या प्रेरणेतून हा वृक्ष लागवडीचा उपक्रम राबवित आहेत.

मुला-मुलींच्या वाढदिवसालाही वृक्षारोपण हवालदार राजीव जाधव व पत्नी हे स्वतः व आपल्या मुला-मुलींचा वाढदिवस वृक्षांची लागवड करून साजरा करतात. जळगाव येथे परिसरात दि.२४/९/२३ रोजी कोल्हे हिल्स फायरिंग बट पोलिस गोळीबार टेकडी याठिकाणी वृक्षाचे महागडे रोप विकत घेऊन स्वताच्या हस्ते रोप लावत असतात.ते अशाच प्रकारे वृक्षारोपण करुन वाढदिवस साजरा करतात. जळगावतील काही मित्र परिवाराला सोबत घेऊन स्वखर्चाने करंज, सिसम, वड, पिंपळ, बेढा, चिंच, निम, सिताफळ,पेरु पेलटाफॉर्म व लिंबाची रोपे लावली. शिवाय विविध रोपटे स्वतःच्या खर्चातून कोल्हे हिल्स फायरिंग बट येथे उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले अशा आगळावेगळा उपक्रम हवालदार राजीव जाधव यांनी राबविण्याला याप्रसंगी वृक्षारोपण कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित मनपा महापौर सौ. जयश्री सुनील महाजन,सपोनि विक्रांत पाटील,सो. विशेष सुरक्षा विभाग जळगाव,सपोनि विक्रांत पाटील,सपोनि भवारी, सो.स.पो.नि.महाले, सो.म.स.पो.नि.जावरे मॅडम, राखीव पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, सो. आर. एस .आय. साळुंके, डॉ. पराग चौधरी,डॉ. जयंती चौधरी मॅडम विजेंद्र हॉस्पिटल जळगाव, फौ.काझी,स.फौ. सोपान पाटील, वन विभागाचे रेंजर श्री पिंजारी, बिल्डर मोहन गायकवाड, व्यापारी संजय महाजन,व विशेष सुरक्षा विभाग अंमलदार इतर मित्रमंडळी उपस्थिती लाभली.

# अल्पवयीन मुलीवर प्रियकरासह ७ जणांचा बलात्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** १५ वर्षीय मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यावर प्रियकरासह सात जणांनी बलात्कार केला. मुलीचे अश्लील छायाचित्र आणि चित्रफिती बनवून मित्रांच्या व्हॉट्सअप ग्रूपवर प्रसारित केल्या. तर अन्य पाच आरोपींनी छायाचित्र दाखवून शारीरिक संबंधासाठी जबरदस्ती केली. याप्रकरणी खापा पोलिसांनी १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.खापा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या एका गावातील पीडित १५ वर्षीय मुलगी दहावीत शिकते. तिचे आईवडिल मजुरी करतात. गावातच राहणारा मुख्य आरोपी धीरज हिवरकर याने प्रेमाच्या जाळ्यात ओढले. २ मार्चला तिला पडक्या घरात नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. धीरजच्या आमिषाला बळ पडलेल्या मुलीने अनेकदा शारीरिक संबंध प्रस्थापित केले. मात्र, धीरजने शारीरिक संबंध ठेवताना चित्रफिती बनवल्या आणि तिचे नग्न छायाचित्र काढले. त्याने मित्र गोलू लिखार, वेदू आवते, लिलाधर चौरागडे या तिघांना प्रेयसीचे अश्लील छायाचित्र व्हॉट्सअपवर पाठवले.

# जिल्हा परिषदेच्या (सौर) दिव्याखाली अंधार

## जलजीवन योजनेतही भ्रष्टाचार : विष्णूपंत भुतेकर यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**अरविंद देशमुख**



**रिसोड :** ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी पंचायतराज मधील सर्वात मोठी व सक्षम यंत्रणा म्हणून जिल्हा परिषदेकडे पाहिल्या जाते. परंतु सध्यस्थितीत जिल्हा परिषदेच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला आहे. सौरऊर्जा योजनेतून वितरीत करण्यात आलेले सौर पथदिवे निकृष्ट दर्जाचे असल्याने रात्रीच्या अंधारात सौर पथदिवे लटकाविलेले खांब दिसणे सुद्धा मुश्किल झाले आहे. शिवाय जलजीवन योजनेत सुद्धा संबंधीत ठेकेदाराची मनमानी आणि सत्ताधारी व विरोधक यांनी " तेरी भी चूप मेरी भी चूप " हे धोरण अवलंबिले असल्याने सदर योजनेत प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार होत आहेत. असा आरोप भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भूतेकर यांनी केला आहे. सदर योजनांची चौकशी होणे गरजेचे आहे. त्याबाबत भूमिपुत्र कडून १ आक्टोबर ते १५ डिसेंबर पर्यंत सर्व तक्रारी जमा करून, संबंधीत अधिकारी यांच्या भेटी घेण्यात येणार आहेत. आणि त्याबाबतचे राज्य सरकार,लोकायुक्त, व केंद्र सरकारकडे निवेदने देण्यात येणार आहेत. एवढे सोपस्कार पार पाडूनही, योजनांच्या भ्रष्टाचाराची चौकशी न केल्यास १ जानेवारी २०२४ पासून जिल्हाभर आंदोलन करण्यात येईल. असा इशारा देखील भुतेकर यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकान्वये दिला आहे. वाशिम जिल्हापरिषद सध्या 'तेरी भी चुप मेरी भी चुप' या मार्गाने मार्गक्रमन करीत आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून संपुर्ण जिल्ह्यात जि.प. सदस्यांच्या बहुतांश सर्कल मध्ये जि.प., प.स, व ग्रामपंचायतीनी नी सौर लाईट बसवलेत. सदर सौर लाईट ची स्थीती अत्यंत दयनीय आसुन रात्रीला लाईट लागल्या नंतर  लाईट लावण्यासाठी लावलेला पोल सुध्दा दिसत नाही. काजवे लागावे त्या पध्दतीचे लाईट जि.प. आणि पंचायत समीत्या आणि ग्रामीण भागातील ग्रामपंचायत कडुन लावले गेले. ग्रामीण महाराष्ट्राचे मीनी मंत्रालय आसलेल्या जि.प. ने  आशा पद्धतीने काम करणे अतिशय चुकीचे आसुन जि.प. प्रशासकीय विभाग देखील हया बाबी पाठीसी घालत आ केंद्र सरकारकडून ग्रामीण भागातील पीण्याच्या पाण्याची सुविधा व्हावी म्हणून जल जीवन मीशन अंतर्गत कोटया वधी रूपयांचा नीधी दिला जात आहे. सदर नीधीची तरतुद झाली तेव्हापासूनच टेंडर मॅनेज करायला सुरुवात झाली होती. जिल्ह्यातील आनेक गावे आणि वाडया वस्त्यावरील जल जीवन मीशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे सुरू आहेत. सदर कामात अनेक पळवाटा शोधुन कामे रेटली जात आहेत. भुजल सर्वेक्षण विभागाने अनेक ठिकाणचे उदभव (विहीरी) हे पदाधिकाऱ्यांच्या इच्छिने दिले आसल्यामुळे खोदलेल्या विहिरींना पाणीच लागले नाही . तरीही पुढे काम करण्याच्या परवानग्या जि.प. जल जीवन मिशनच्या अभियंत्यांकडुन देण्यात आल्याचे माजी जि.प. सदस्य विरोधी पक्ष नेते विष्णुपंत भुतेकर यांनी म्हटले आहे. अनेक ठिकाणी ग्रामीण जनतेच्या पैशाची लुट जल जीवन मीशन च्या माध्यमातून होत आसुन भूमिपुत्र कडुन जि.प.चे सौर लाईट आणि जल जीवन मीशन अंतर्गत सुरू आसलेला भ्रष्टाचार निखदुन काढला जाणार आहे. भूमिपुत्र कडुन पुढाकार घेतला जाणार आसुन १ आक्टो. पासुन जिल्ह्यातील अधिकार्यांना भेटुन निवेदन देणे, १५ आक्टोबरपासून राज्य शासन, राज्य लोक आयुक्त व केंद्र शासनाला निवेदन देणे. १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर पर्यत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्व तक्रारी जमा करणे व १ जानेवारीपासून पासुन भूमिपुत्र कडुन जिल्हाभर अदोलंन उभे केले जाणार आसल्याचे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी म्हटले आहे.



## ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त भव्य मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहंमद पैगंबर यांचा जन्मदिवस उर्दू महिन्याच्या 12 तारखेला म्हणजे 28सप्टेंबर रोजी साजरा करण्यात आला. या निमित्त शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. यात हजारो मुस्लिमबांधव सहभागी झाले होते. ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त सजवलेल्या गाड्या, हिरव्या पताका, शुभेच्छा फलक घेऊन आबालवृद्धांसह शहरातील विविध परिसरातील मुस्लिम बांधव मिरवणुकीत सहभागी होते. डोक्यावर पगडी, सदा अशा पारंपरिक वेशात सहभागी मुस्लिम बांधवांनी शिस्तबद्ध मिरवणूक काढली. या वेळी इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत महंमद पैगंबर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ईद-ए-मिलादुन्नबी .. निमित्त हजरत मोहम्मद मुस्तफा सल्लाल्लाहू सल्लाम पैगंबर यांच्या जीवनावर माहिती देण्यातआली. जुलूस-ए- मोहंमदी सकाळी 9:00 वाजता स्थनिक जामा मशीद चौक येथून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. येथून मुख्य मार्गाने  पोलीस स्टेशन, साबणपुरा,येथून कब्रस्तान येथील ईदगाह येथे मौलाना अलहाज मोहम्मद रफीऊद्दीन अशरफी साहब किबला, परभणी व शहरातील सर्व मजीद मधील मौलाना यांनी प्रवचन करून मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. प्रेषित मोहंमद पैगंबर यांनी जगाला दिलेली शांती आणि मानवतेची शिकवण समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचावी हा उद्देश असल्याचे  सांगितले. मुस्लिमबहुल वस्त्यांमध्ये आकर्षक विद्युत रोषणाई, पताके, झेंडे लावून सजावट करण्यात आली होती. मिरवणुकीमध्ये सहभागी झालेल्यांसाठी सामाजिक संघटना कार्यकर्त्यांकडून अल्पोहार पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मिरवणुकीत आझाद नगर, रोशन पुरा, गुलाबखां मोहल्ला, नवी नगरी, जमजम कॉलोनी, कुरेशी नगर, घरकुल, इंदिरानगर, गवळीपुरा या भागातील मंडळांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता व शांततेच्या मार्गाने मिरवणूक उत्साहात पार पडली यावेळी ठाणेदार निमीश मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक युवराज रबडे, पीएसआय राजाभाऊ घोगरे, पीएसआय गोपाळ राठोड, पीएसआय सागर इंगळे, गोपनीय विभागाचेच संतोष चव्हाण, विठ्ठल चव्हाण, टाऊन चे संजय जाधव, संतोष चव्हाण, पो. का गणेश लोंढे, ट्रॅफिकचे पंढरी गीते, मनोज शेजुळ, व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोणती अनुसूचित घटना घडवू नये यासाठीच चोख बंदोबस्त ठेवला होता यावेळी लोणार शहरातील मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते. हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनानिमित्त  लोणार शहरात जागोजागी मुस्लिम समाजाच्या वतीने अल्प आहाराचा व मिठाईचा व थंड प्यायचा, चौकात चौकात समाज बांधवाकडून आयोजित करण्यात आला होता.

## जिंतूरच्या संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी सणासुदीच्या काळातही उपेक्षितच

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची अनुदान जून महिन्यापासून थकीत आहे ते अद्याप लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाले नसून गोरगरीब वृद्ध, अपंग, परित्यक्ता, विधवा महिला, निराधार यांचे देय असलेले अनुदान तीन ते चार महिन्यांपासून न मिळाल्याने त्यातच गौरी गणपती असो की ईद या सणालाही निराधार यांना उपेक्षितच राहावे लागले आहे.

सदर अनुदानही एकूणच जिंतूरच्या लाभार्थ्यांची थकीत असल्याची माहिती समोर आली असून अद्यापही अनुदान मिळाले नसल्याने सर्व लाभार्थ्यांची गैरसोय होत असून सर्व निराधारांना  सणासुदींच्या काळातही दुसऱ्यांकडे हात पसरवण्याची वेळ येत आहे. तरी याकडे लोकप्रतिनिधी, तहसीलदार प्रशासनातील संबंधित अधिकारी यांनी गांभीर्याने लक्ष घालून तात्काळ आजपर्यंतची देय असलेली रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

याप्रकरणी जिंतूरच्या विद्यमान आमदार मेघना दिदि साकोरे बोर्डीकर यांनी  पालकमंत्री व संबंधितांना  सांगून निराधार यांचे अनुदान लवकरात लवकर त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी सांगावे म्हणजे वृद्ध, अपंग ,महिला परिकत्यांना सणासुदीच्या काळातही दुसऱ्याकडे हात पसरण्याची वेळ येणार नाही अशी मागणी निराधार लाभार्थ्यांकडून जोर धरत आहे.

## पीएम स्वनिधीचे प्रस्ताव स्टेट बँकेत धूळखात

### लाभार्थ्यांच्या खात्यात निधी जमा करण्यास बँक अधिकाऱ्यांची टाळाटाळ

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** छोटया व्यवसायिकांना व्यवसाय करण्यासाठी शासनाकडून हातभार म्हणून केंद्र सरकारने पी एम स्वनिधी म्हणून विना अट विना व्याजी दहा हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची योजना अंमलात आणली या पी एम स्वनिधी योजनेच्या जवळपास तीनशे लाभार्थ्यांनी व्यवसायासाठी मदत मिळावी म्हणून स्टेट बँक खातेदारांनी अनलाईन अर्ज केला केंद्र सरकारच्या योजनेत त्यांचा अर्ज मंजूर ही झाला बँके नी अनलाईन पात्र लाभार्थ्यांकडून रीतसर प्रस्थाव मागवून घेतले रशीद तिकीट लावून लाभार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या आणि निधी ची रक्कम खात्यात जमा होईल असे सांगून मोकळे झाले परंतु या बाबीला एक दोन महिने होत आहेत अद्याप स्टेट बँकेच्या खातेदार लाभार्थ्यांच्या खात्यात स्वनिधी ची रक्कम जमा करण्यात आली नाही बँक अधिकारी स्वनिधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यास टाळाटाळ करीत असल्याने स्वनिधी चे प्रस्थाव स्टेट बँकेत धूळखात पडून आहेत लाभार्थी मात्र निधीच्या प्रतीक्षेत असून त्यांनी तात्काळ निधी खात्यात जमा करावा यासाठी प्रशिदी माध्यमाकडे धाव घेतली आहे.

एके काळी भारतीय स्टेट बँक म्हटले की या बँकेचा कारभार पारदर्शक असायचा या बँक व्यवहारात दलाली चालत नव्हती म्हणून खातेदारांची संख्या मोठी आहे खातेदारांना स्टेट बँकेच्या कार्यपद्धतीवर विश्वास होता परंतु सद्याच्या काळात बँकेच्या व्यवहारात दलाली सुरू झाली आहे यामुळे गोरगरीब स्वयंरोजगार करणारे छोटे व्यवसायिकांना केंद्र सरकारने सुरू केलेल्या स्वनिधी  ची  दहा हजार रुपयांची मदत वेळेवर मिळत नाही अनलाईन दहा हजार रुपयांचा स्वनिधी मंजूर होऊन ही केवळ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणा मुळे लाभार्थ्यांच्या खात्यावर निधी ची रक्कम जमा केली जात नाही छोट्या व्यवसायिकांना या निधीची प्रतीक्षा करावी लागत आहे याकडे बँकेच्या वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देऊन हातावर छोटा व्यवसाय करून पोट भरणाऱ्या लाभार्थ्यांना पी एम स्वनिधीची रक्कम देऊन योजनेचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.

## विद्यार्थ्यांना रोजगाराबरोबर स्वाभिमानाने जीवन जगण्याची संधी : गणेश कदम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आमची कंपनी मानवतेला जास्त महत्त्व देते. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक प्रोडक्शन करीत आहे.आमच्या कंपनीमध्ये प्रोडक्शन विभागांमध्ये काम करण्यासाठी अनेक होतकरू विद्यार्थ्यांची गरज आहे.त्यासाठी आम्ही शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद येथे विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी आलो आहोत. विद्यार्थ्यांना रोजगाराबरोबर स्वाभिमानाने जीवन जगण्याची संधी मिळावी ही भूमिका आमची आहे. आम्ही टेस्ट घेऊन विद्यार्थ्यांची निवड करणार आहोत, असे प्रतिपादन एच.आर.गणेश कदम यांनी केले. ते लोणंद येथील रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद येथे करियर काउंसलिंग व प्लेसमेंट सेल विभाग आणि महाविद्यालयातील आयक्यूएससी विभागाच्या वतीने कॅम्पस इंटरव्यू चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्पॅनिश देशाची कंपनी सिकाटेक्सो प्रायव्हेट लिमिटेड पुणे च्या वतीने कॅम्पस इंटरव्यू चे आयोजन करण्यात आले होते.कंपनीचे



एच.आर.गणेश कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी कंपनीच्या वतीने ४८ विद्यार्थ्यांची टेस्ट व मुलाखत घेण्यात आली. त्यामधून सर्वोत्तम १३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यावेळी  महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य, उपप्राचार्य, करियर काउंसलिंग व प्लेसमेंट सेल विभागाचे प्रमुख, आयक्यूएससीचे चेअरमन व इतर, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# शरद पवारांच्या उपस्थितीत किल्लारीत कार्यक्रमाचे आयोजन

## किल्लारी भूकंपाला ३० वर्षे पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** गेल्या काही वर्षामध्ये जगभरात भूकंप



झाल्याच्या कितीतरी बातम्या आपल्या कानावर आल्या असतील. पण काही भूकंपामध्ये झालेली जीवितहानी कधीकधी मनाला चटका लावून जाते. त्यामधून झालेले नुकसान भरून काढण्यासाठी खूप वेळ लागतो, शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खचलेल्या माणसांना त्यामधून बाहेर काढणे खूपच कठीण होऊन बसते. देशभरातील सर्वात भयानक भूकंपापैकी एक म्हणजे, लातूर येथील किल्लारी येथे झालेला भूकंप. या भूकंपला ३० वर्षे पूर्ण झाले आहेत. किल्लारीमध्ये झालेला भूकंप म्हणजे भारतातील सर्वात विनाशकारी भूकंपांपैकी एक होता. १९९३ ला झालेला हा भूकंप राज्यातील सर्वात मोठा नैसर्गिक प्रकोप होता. या वेळी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पावर हे होते. येत्या ३० सप्टेंबर ला शरद पावर किल्लारी दौरा कराणार आहेत. शरद पावर यांच्या उपस्थितीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

29 सप्टेंबर 1993च्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी विघ्नहर्त्या गणरायाला निरोप देऊन संपूर्ण गाव झोपेत असताना पहाटे 3 वाजून 56 मिनिटांनी भूकंप झाला.

**नेमका कसा झाला भूकंप :** ३० सप्टेंबर १९९३ साली पहाटे ३.५६ वाजता लातूर जिल्ह्यात किल्लारी इथं भूकंप झाला आणि होत्याचं नव्हतं झालं... : लातूर - उस्मानाबाद जिल्ह्यांत ३० सप्टेंबर १९९३ ला झालेल्या महाप्रलंयकारी भूकंपाला शनिवारी (ता. ३०) ३० वर्षे पूर्ण होत आहेत. ३० सप्टेंबर



१९९३ च्या पहाटे झालेल्या ६.४ रिश्टर स्केल तीव्रतेच्या या भूकंपाने दोन्ही जिल्ह्यांतील ५२ गावांना हादरा दिला. भूकंपाने अनेकांचे प्राण हिरावले. घरे-दारे नष्ट झाली. क्षणार्धात सर्वकाही होत्याचे नव्हते झाले. शासनाने घरांचे पुनर्वसन केले. मात्र मूलभूत गरजा पुरविण्यात शासन अपयशी ठरल्याची खंत या प्रदीर्घ कालावधीनंतरही कायम आहे.आजपासून ठिक ३० वर्षांपूर्वी लातूरमध्ये झालेल्या भूकंपाच्या आठवणीने आजही महाराष्ट्र हादरतो. आजही 30 सप्टेंबर 1993च्या पहाटेचा विचारही लातूरकरांच्या काळजाचा ठोका चुकवतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान अध्यक्ष शरद पवार हे तेव्हा मुख्यमंत्री होते. 30 सप्टेंबर 1993 ची ती पहाट. गणेशोत्सव विसर्जनाचा तो दिवस. अचानक महाराष्ट्र हादरुन गेला. जमीन थरथरत होती. घरे हालत होती. कोणालाच काही समजत नव्हते. भूकंप होत होता. लातूर जिल्ह्यातील किल्लारी या गावात भूकंपाचा केंद्रबिंदू होता. या भूकंपात 52 गावांमधधील तब्बल 30 हजार घरं धरणीनं पोटात घेतली. 16 हजार लोक जखमी झाले. मृत्यूंचा आकडा वेगवेगळा सांगितला जातो. भूकंपमापन यंत्रावर या भूकंपाची नोंद 6.4 रिश्टर स्केल इतकी झाली होती.

भूकंपग्रस्तांचे अपेक्षित पुनर्वसन झाले का?

किल्लारीसह भूकंपग्रस्त सर्वच गावांचे पुनर्वसन झाले आहे. मात्र मूलभूत सुविधांअभावी ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. येथील तीस खेडी पाणीपुरवठा योजना कायम या ना त्या कारणास्तव विस्कळित राहिली आहे. आजही ही योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नाही. त्यामुळे पाणीप्रश्न कायम आहे.कबालेंचा प्रश्न कायम आठव्या आणि नवव्या फेरीतील कबाले (जागेचा मालकी हक्क) वाटपाचा प्रश्न सुटलेला नाही. , रोजगाराच्या संधीही उपलब्ध कराव्यात, भूकंपग्रस्तांचा शासकीय नोकरीतील अनुशेष भरून काढण्यासाठी कायम ओरड सुरू आहे. हा प्रमुख मुद्दा शासनाने प्राधान्याने मार्गी लावावा, अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे.भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन झाले; पण अपुऱ्या सुविधांमुळे या भागात येणाऱ्या कर्मचारी वर्गाला ये-जा करावी लागते. मूलभूत गरजांच्या पूर्तीसह शैक्षणिक दर्जा वाढीसाठीही प्रयत्न व्हावेत.

# दडपशाहीने आ. रोहित पवार यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रीय नेते शरद पवार यांचे पुरोगामी विचार घेऊन महाराष्ट्रभर फिरणारे



पक्षाचे युवा आमदार रोहित पवार यांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न विद्यमान सरकारने केला आहे. कायद्याची पायमल्ली करून तसंच केंद्रीय यंत्रणेचा धाक दाखवून महाराष्ट्राच्या जनतेच्या मानगुटीवर बसलेल्या विद्यमान असंविधानिक सरकारचा जाहीर निषेध राष्ट्रवादीचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केला. महाराष्ट्रात आमदार रोहित पवारांची लोकप्रियता अनेक लोकांना बघवत नाही व त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेचा आड घेऊन राजकीय डाव साधण्यासाठी रोहित पवारांच्या कंपनीवर कार्यवाही मुख्यमंत्री शिंदे यांच्या सरकारने केल्याचा गंभीर आरोप तपासे यांनी केला आहे. महाराष्ट्र याला घाबरत नाही तुम्ही कितीही पुरोगामी विचारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला तरी देखील आमचं मनोबल खच्चीकरण होत नाही आणि आता रोहित पवारांसोबत महाराष्ट्रातले लाखो तरुण या सरकारचं विसर्जन करण्यासाठी कामाला लागलेले आहेत. संसद रत्न खासदार सुप्रिया सुळे व आमदार रोहित पवार यांनी भाजपच्या सोबत जाण्याला विरोध दर्शवल्यामुळे सरकारमध्ये सामील झालेल्या अनेक आमदारांची गोची झाली आहे त्यांच्या मतदारसंघातील पक्षाचे कार्यकर्ते जैसे थे या परिस्थितीत आदरणीय पवार साहेबांसोबत राहिले. सरकारसोबत गेलेले अनेक आमदार पराभवाच्या छायेत असल्याचा दावाही महेश तपास यांनी केला. मा.अजित दादा पवार शिंदे सरकारमध्ये सामील झाल्यानंतर देखील राष्ट्रवादीचा जनाधार महाराष्ट्रात कमी झाला नाही याचा दुःख भाजपला आहे आणि म्हणूनच ही कारवाई केली असल्याचा आरोप तपासे यांनी केला. सूडबुद्धीने केलेल्या या कारवाईचे उत्तर बारामतीची जनता आणि महाराष्ट्रातले मतदार योग्य वेळी देणार अशी घोषणा महेश तपासे यांनी केली.

# बेगमपुरा पोलिसांनी व माणुसकी समूहाने दिला २९ वर्षीय महिलेला मायेचा हात

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** आपल्या घरातील स्त्री बाहेर गेली आणि घरी परत यायला तिला उशिर झाला की जीव कासाविस होतो. रात्री अपरात्री काही झालं तर? मात्र ती घरात सुखरूप आल्या नंतर आपली काळजी संपते. घरातल्या चार भिंतींच्या मर्यादेत ती सुरक्षित असते. पण अशाच असुरक्षित व धोक्याच्या वातावरणात कित्येक स्त्रिया रात्री भटकत असतात; ती कुणाची तरी आई, मुलगी, अथवा पत्नी, किंवा बहीण असेल. पण त्यांची वाट पाहणारं असं कुणीच नाही, अशा अनेक महिला ज्यांना त्यांच्या आपल्या लोकांनीच व समाजाने देखील सोडून दिलं आहे. कारण त्या आजारी आहेत मनोविकृत आहेत.

बेगमपुरा शहर पोलीस स्टेशन हद्दीत काल रात्री घाटी परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून घरचे सांभाळत नाहीत म्हणून एक महिला विपन्न अवस्थेत फिरत होती,पोलीसांनी तीची विचारपूस केली असता ती रडायला लागली माझी मदत करा? पोलीसांनी तीला बेगमपुरा पोलीस स्टेशन आणले व उपपोलीस निरिक्षक शेख यांनी महिलेची विचारपुस केली असता तीने आपली आपबीती सांगीतली. आम्ही आंबोली शहाड कल्याण मुंबई येथे राहत होतो माझे आई वडील मयत आहे वडिलांनी लहानपणी लग्न लावून दिले होते परंतु लग्नानंतर काही दिवस नवऱ्याने सांभाळले आम्हाला एक मुलगाही झाला व नवऱ्याने फारकती दिली. मला सांभाळणारे दुसरे कोणीही नव्हते माझी बहीण मयूर पार्क संभाजीनगर येथे



ओरिएंटल शाळेजवळ राहते परंतु तिने देखील मला सांभाळण्यास नकार दिला व माझ्या पाच वर्षाच्या मुलाला ती सांभाळते मी गेल्या दोन वर्षापासून इकडे तिकडे भरकटत फिरते व रेल्वे स्टेशनवर पोलिसांच्या मदतीने सहारा घेऊन तिथे झोपते मी गेल्या एक वर्षात रेल्वेने पूर्ण महाराष्ट्रभर प्रवास केला परंतु खूप भीती वाटत असे , की बाहेर एकट्या महिलेने कसं राहायचं म्हणून आज साहेब तुम्ही माझी मदत करा असे सांगून पोलिसांना तिच्यावर घडलेली आपबीती सांगितली असता पोलीसांनी त्या महिलेची चौकशी केली असता. पोलीसांनी मयुरपार्क येथे तीच्या बहिणी च्या घरी घेवून गेले असता तीच्या बहिणीने पोलीसांना स्पष्ट नकार दिला की मी हिला सांभाळून शकत नाही तुम्ही बघा तीचे काय करायचे ते व तीच्या बहिणीच्या सांगण्यावरुन ही एक बेवारस निराधार महिला आहे हे पोलीसांच्या लक्षात आले व पुनर्वसनासाठी कुठल्या समाजिक संस्थेचे स्वयंसेवक काम करतात का, त्यात पोलीसांनी सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि माणुसकी रुग्ण समूहाचे सामाजसेवक श्री सुमित पंडित यांचे नाव पुढे आले त्यांना माहिती दिली, असता सुमित पंडित यांनी त्या महिलेला पुनर्वसना साठी कायदेशीर कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करुन व शासकीय रुग्णालयात सायाक्राटिक्स विभाग व प्रथोमपचाराकरीता घाटी दवाखान्यात दाखल केले. मेडिकल करुन समाजसेवक सुमित पंडित यांनी आपले माणुसकी वृध्द सेवालय येथे पुणर्वसनासाठी नेण्याचे ठरवले,व माणुसकी वृध्दाश्रम येथे पुणर्वसनासाठी मदतकार्य केले.या सामाजिक कार्यात रामेश्वर गाडे पोलीस निरीक्षक बेगमपुरा,हरेश्वर घुगे,साय्यक पोलीस निरिक्षक,हारून शेख,विनोद भालेराव,पोलीस उप निरीक्षक,गजानन तुपे, प्रवीण बोदवडे,प्रकाश मानवते पोलीस हवालदार,भाग्यश्री वानखेडे.स्वाती वानखेडे, महिला पोलीस शिपाई सर्व पोलीस स्टेशन बेगमपुरा व माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित, समाजसेवीका पुजा पंडित आदींनी मेहनत घेतली.

# शरद पवारांना जेलमधून ब्लॅकमेल करायचे छगन भुजबळ !

## रमेश कदमांचा खळबळजनक दावा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे विद्यमान मंत्री छगन भुजबळ तुरुंगात असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना ब्लॅकमेल करायचे, असा खळबळजनक दावा माजी आमदार रमेश कदम यांनी केला. कदम यांची नुकतीच जामिनावर सुटका झाली आहे.ते माध्यमांशी संवाद साधत होते. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळात भ्रष्टाचार केल्याप्रकरणी कदम जेलमध्ये होते. माध्यमांशी बोलताना रमेश कदम यांनी म्हटले, छगन भुजबळ शरद पवार यांना जेल मधून ब्लॅकमेल करायचे. जामिनासाठी भुजबळांची धडपड सुरू होती. आपला जामीन झाला नाही तर मला वेगळा मार्ग स्वीकारावा लागेल असा इशारा देत भुजबळ त्यांना ब्लॅकमेल करत असत असा दावा कदम यांनी केला. भुजबळ जेव्हा तुरुंगात होते तेव्हा त्यांच्यांशी माझी भेट होत असे. त्यावेळी भुजबळ हे पवार साहेबांनी मला मदत केली पाहिजे. जामिनाला खूपच उशीर होत आहे, असे म्हणतंनाराजी देखील बोलून दाखवायचे. सत्तेतील आताचे छगन भुजबळ आणि तुरुंगामध्ये असतानाचे छगन भुजबळ याच्यात खूप फरक आहे. जेलमध्ये ते रोज आजारी पडायचे. काकूळतीला यायचे त्यांना रोज उपचाराची गरज होती. जेलमधून बाहेर आल्यापासून आम्ही बातमी ऐकली नाही छगन भुजबळ यांच्या छातीत दुखतंय, असेही कदम यांनी म्हणत भुजबळांना टोला लगावला. सहानुभूती मिळवून कसा जामिन मिळवायचा हे देखील त्यांना माहित आहे. परंतु जेल ही कोणाच्या नशिबात येऊ नये नरक आहे, असेही कदम म्हणाले.

**अण्णा भाऊ साठे महामंडळात 312 कोटींचा घोटाळा केल्याप्रकरणी कदम होते तुरुंगात**

अण्णा भाऊ साठे महामंडळामध्ये 312 कोटी रुपयांच्या घोटाळा केल्याचा आरोप रमेश कदम यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायमूर्ती राहुल रोकडे यांनी त्यांना सर्व गुन्ह्यांमध्ये जामीन मंजूर केला. मोहोळ मध्ये परतल्यानंतर कदम यांचे त्यांच्या समर्थकांनी जंगी स्वागत तसेच जल्लोष केला. कदम यांनी कोणतीही राजकीय भूमिका स्पष्ट केली नाही.

तुरुंगात असताना ही कदम हे या ना त्या कारणानं रमेश कदम सतत चर्चेत राहिलेत. मागे एका व्हिडीओ क्लीपमध्ये कदम आर्थर रोड जेलमध्ये कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांना शिवीगाळ करत असल्याचं दिसलं होतं. त्यासंदर्भात रमेश कदम यांच्याविरोधात नागपाडा पोलिस स्टेशनमध्ये गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. मात्र, 'पोलिसांनीच मला जातीवाचक शिवीगाळ केली आणि 25 हजारांची लाच मागितली' असा त्यांचा दावा होता. तसेच भायखळा जेलमध्ये असताना वॉर्डन मंजुळा शेट्ये हत्या प्रकरणातही रमेश कदम यांनी पोलिसांवर आरोप केले होते.

# जिंतूर तालुक्यात मनोज जरांगे यांची जाहीर सभा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** मराठा समाजाला ओबीसी आरक्षण



देण्याच्या मागणी साठी तब्बल 17 दिवस उपोषण करून राज्य सरकारने दिलेल्या मुदतीत आरक्षण दिले नाही तर पुढील दिशा काय असेल यासाठी मराठवाडा दौर्याचे आयोजन करण्यात आले आहे या निमित्त जिंतूर शहरात भव्य जाहीर सभेचे आयोजन दिनांक 30 सप्टेंबर रोजी दुपारी 4 वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे म्हणून मराठा समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

जालना जिल्ह्यातील अंतरवाली सरटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसगट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीसाठी तब्बल 17 दिवस उपोषण केले होते याची दखल घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरक्षण देण्यासाठी चाळीस दिवसाचा वेळ मागून घेतला होता म्हणून उपोषण सोडून त्याच ठिकाणी ठिय्या आंदोलन चालु ठेवले होते दरम्यान राज्य सरकारने मागितलेला चाळीस दिवसाचा वेळ 14 ऑक्टोबर रोजी संपत आहे म्हणून दिलेल्या मुदतीत मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळाले नाही तर पुढील दिशा काय असेल यासाठी सऊंवाद दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे याच दौऱ्यात जिंतूर शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे या सभेसाठी तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जळगाव शहर बससेवेचा मार्ग मोकळा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** शहर बससेवेच्या जागेचा शोध आता थांबला असून, जुन्या स्थानकाची जागा शहर बससाठी देण्यास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे तत्त्वतः मान्यता दिली असल्याची माहिती महापालिका प्रशासनातर्फे देण्यात आली. त्याअनुषंगाने आता जुन्या बस स्थानकापासून शहर बससेवा सुरू होणार आहे. त्यासंदर्भातील बसच्या मार्गांचे नियोजनही करण्यात आले आहे. केंद्र सरकारतर्फे पीएम ई-बससेवा योजनेंतर्गत जळगावात शहर बससेवा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी केंद्र सरकारच्या योजनेतूनच शहरासाठी वातानुकूलित ५० बस मिळणार आहेत. शहर बससेवा सुरू करण्याबाबत महापालिकेच्या २३ ऑगस्ट रोजी झालेल्या शेवटच्या महासभेत ठराव मंजूर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने आयुक्त तथा प्रशासक डॉ. विद्या गायकवाड यांनी शहर बससेवेसंदर्भात प्रक्रिया सुरू केली. महापालिकेतर्फे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे जुन्या स्थानकाच्या जागेची मागणी करण्यात आली होती. त्यावेळी महामंडळाकडून नकार देण्यात आला होता. आता मात्र महामंडळाने केवळ बससेवेसाठी जागा देण्यास तत्त्वतः मान्यता दिल्याचे सांगण्यात आले.